71

REG. NO. B. 1075.

ब्रह्मविद्याग्रन्थरत्नमाला, वर्ष दुसरें,
अंक नववा.

दर्शन आठवें.

# श्रीमाहेश्वरदर्शनसार.

## ( समतभेद. )

( पाशुपत, शैव, प्रत्यभिज्ञा व रसेश्वर या चारी माहेश्वरांचीं मतें. )

संपादक व प्रकाशक

आचार्यभक्तः–विष्णु वामन बापट.

आश्विन शु. ५ शके १८३६ आनन्दनामसंवत्सरे

पुणें ता. २४ सप्टेंबर १९१४.

**प्रकाशक**—विष्णु वामन बापटशास्त्री, पुणें पेठ सदाशिव नंबर २४१ यांनीं हें मासिक पुणें पेठ सदाशिव नं. २४१ येथें प्रसिद्ध केलें.

**मुद्रक**—त्रिंबक हरि आवटे, पुणें पेठ सदाशिव नं. १८१ यांनीं हें मासिक पुणें पेठ सदाशिव नंबर १८१ येथील आपल्या 'इंदिरा' छापखान्यांत छापिलें.

किंमत चार आणे.

## वाचकांस सूचना.

गेल्या अंकाच्या मलपृष्ठावरील सूचनेप्रमाणें आज हा नववा अंक दर्शनाचाच प्रसिद्ध केला आहे. आतां आणखी एक दर्शन प्रसिद्ध केलें म्हणजे २। रु. भरून पौष अखेरपर्यंत दर्शनमालेला जे ग्राहक झाले आहेत त्यांच्या ऋणांतून आम्ही मुक्त होऊं. राहिलेल्या दर्शनांत जैमिनिदर्शन व पाणिनिदर्शन यांचा सारांश देण्याचें योजिलें आहे. म्हणजे ब्रह्मविद्याग्रन्थरत्नमालेच्या तिसऱ्या वर्षापासून वैशेषिकादि दर्शनें मूळसूत्रांसह सार्थ व सविवरण प्रसिद्ध करावयास बरें पडेल.

---

या पुढील दहा, अकरा व बारा हे तिन्ही अंक उपनिषदांचेच प्रसिद्ध होतील. राहिलेलें दर्शन आम्ही नोव्हेंबरांत अकराव्या अंकाच्या पुरवणीच्या रूपानें प्रसिद्ध करूं. म्हणजे राहिलेली पृष्टसंख्या भरून निघेल. कागदाच्या टंचाईमुळें बृहदारण्यकोपनिषद् तूर्त सुरू करतां येत नाहीं. यास्तव अगोदर ईश-केन इत्यादि पहिलीं सहा उपनिषदेंच भाष्यार्थासह प्रसिद्ध करण्याचा निश्चय केला आहे.

---

ज्यांच्याकडून दुसऱ्या सहामाहीची व दर्शनांची दुसऱ्या वर्षाची वर्गणी यावयाची असेल त्यांनीं ती सत्वर पाठवावी. किंवा व्ही. पी.चा स्वीकार करावा. आजवरचे अंक घेऊन वर्ष संपत आल्यावर केलेल्या व्ही. पी.चाही स्वीकार न करितां पुष्कळ सुजन ती नाकारतात व त्यामुळें आमचें नुकसान होतें. या गोष्टीकडे ग्राहकांनीं दुर्लक्ष करूं नये.

---

आश्विन शुक्ल व कृष्ण एकादशीच्या आचार्यांत 'शांकरभाष्यानुसार गीतारहस्य' हाच लेख मुख्यतः येणार आहे. तरी ज्यांना गीतारहस्याची दुसरी बाजू वाचावयाची असेल त्यांनीं दोन आण्यांचीं तिकीटें पाठवून ते दोन अंक मागवावे. त्यांत आह्मी श्रीमद्भगवद्गीता ज्ञानप्रधान असून अर्जुनाला मुख्यतः स्वधर्माचरणाचा उपदेश केला आहे, असें सप्रमाण दाखविणार आहों. आचार्य पाक्षिकाच्या ग्राहकांना निराळे दोन आणे पाठवावयास नकोत.

ब्रह्मविद्याग्रन्थरत्नमाला, वर्ष दुसरें, अंक नववा.

दर्शन आठवें.

# श्रीमाहेश्वरदर्शनसार.

## ( समतभेद. )

( पाशुपत, शैव, प्रत्यभिज्ञा व रसेश्वर या चारी
माहेश्वरांचीं मतें. )

संपादक व प्रकाशक

आचार्यभक्तः—विष्णु वामन बापट.

दीक्षाप्रवेशमात्रेण ब्राह्मणो भवति क्षणात् ।
कापालं व्रतमास्थाय यतिर्भवति मानवः ॥ १ ॥
मुद्रिकाषट्कतत्त्वज्ञपरमुद्राविशारदः ।
भगासनस्थमात्मानं ध्यात्वा निर्वाणमृच्छति ॥ २ ॥
कण्ठिका रुचकं चैव कुण्डलं च शिखामणिः ।
भस्म यज्ञोपवीतं च मुद्राषट्कं प्रचक्षते ॥ ३ ॥
कार्यं च कारणं चैव योगो मोक्षो विधिस्तथा ।
पदार्थाः पञ्च प्राक्प्रोक्ता पशुपाशविमुक्तये ॥ ४ ॥

आश्विन शु. ५ शके १८३६ आनन्दनामसंवत्सरे

पुणें ता. २४ सप्टेंबर १९१४.

किंमत चार आणे.

# प्रस्तावना.

दर्शनमालेंतील हें आठवें दर्शन 'माहेश्वरदर्शनसार' समतभेद आज आम्ही आपल्या वाचकांना समर्पण करीत आहों. यांतील चारी मतें आम्ही श्रीमन्माधवाचार्यांच्या सर्वदर्शनसंग्रहांतील त्या त्या दर्शनाच्या आधारानें लिहिलेलीं असून त्यांचें खंडन 'समतभेद'* या मथळ्या-खालीं श्रीशंकराचार्य व श्रीरामानुज यांच्या भाष्यांच्या आधारानें लिहिलें आहे. माहेश्वरदर्शनासंबंधीं अधिक माहिती पाशुपतागमांत आहे व त्या त्या मताच्या प्रवर्तक लोकांनीं त्याशिवाय दुसरेही प्रकरणग्रंथ लिहिले आहेत, असें वाटतें. कारण माधवाचार्यांनीं सर्वदर्शनसंग्रहांत त्यांचा उल्लेख केला आहे. पण ते ग्रंथ हल्लीं कोठें उपलब्ध होत नाहींत.§ याचें कारण आह्मांस असें वाटतें कीं कोणत्याही मताच्या अनुयायी लोकांत विद्वानांचा अधिक भरणा असला तरच तें मत पुष्कळ दिवस टिकतें. त्याविषयीं अनेक ग्रंथ होतात. अध्ययन व अध्यापन यांच्या द्वारा त्यांचा संप्रदाय चालतो व इतर लोकांनाही तें मत जिवंत आहे, असें वाटतें. पण ज्या मताचे अनुयायी फारसे विद्वान् नसतात तें मत फक्त त्यांच्या अंधश्रद्ध व अज्ञ अनुयायी जनांत गतानुगतिक न्यायानें राहतें. माहेश्वरांची स्थिति जवळ जवळ अशीच आहे.

---

* वस्तुतः 'समतभेद' याच्या ऐवजीं 'सखंडन' असेंच आरंभीं म्हणावयास पाहिजे होतें, पण या पुस्तकाचीं पहिलीं कांहीं पृष्ठें जेव्हां छापलीं तेव्हां आम्ही येथें नव्हतों. आचार्य व मासिक यांना ग्राहक मिळविण्यासाठीं सातारा, कऱ्हाड इत्यादि स्थानीं गेलों होतो. त्यामुळें त्यांत 'समतभेद' हेच शब्द मागील दर्शनाच्या अनुरोधानें राहिले. तथापि प्रस्तुतदर्शनही अवैदिक असल्यामुळें व वैदिक आचार्यांनीं त्याचें खंडन केलेलें असल्यामुळें वाचकांनीं 'समतभेद' याचा अर्थ 'सखंडन' असा समजावा.

§ काश्मीरांत कांहीं ग्रंथ असून माहेश्वरमताचे अनुयायीही तेथें आहेत, असें ऐकतों.

पण येथें माहेश्वर व हल्लीं प्रचारांत असलेले शैव यांच्याविषयीं थोडीशी अधिक माहिती देणें अवश्य आहे. या दर्शनसारांत ज्यांचें वर्णन केलें आहे तशा तऱ्हेचे माहेश्वर हल्लीं हिंदुस्थानांत फारच थोडे आहेत; व जे आहेत तेही फारसे विद्याविभूषित नाहींत. ते भिक्षा वगैरे मागून आपला निर्वाह करतात. पण चिताभस्माचें त्रिकाल स्नान इत्यादि फारसे कोणी करीत असतील, असें वाटत नाहीं. दक्षिण हिंदुस्थानांत लिंगाईत या नांवाचे लोक आहेत ते माहेश्वरच होत. लिंगधारण, भस्मलेप, मुंडन इत्यादि प्रकार त्यांच्यामध्यें रूढ आहेत. त्यांचे गुरु आपल्या संन्याशांसारखेच विरक्त व परिग्रहशून्य असतात. गृहस्थ लिंगाईत त्यांची पूजा मोठ्या भक्तीनें करितात. ते गृहस्थांना उपदेश करितात. ते प्रायः नंदीची उपासना करितात. व्यासंतोळासारखे प्रकार याच लोकांकडून होतात. उत्तर हिंदुस्थानांतही जति या नांवाचे माहेश्वर आहेत. पण वस्तुतः श्रीशंकराचार्यांनीं त्यांच्या मताचें खंडन केलेलें असतांना अलीकडे अज्ञानामुळें ते शंकराचार्यांना आपला गुरू मानतात. जगन्नाथपुरीच्या शिष्यस्वामींनीं अशा पुष्कळ जतींना आपले शिष्य केलें आहे. आपल्याइकडे बैरागी म्हणून जे प्रसिद्ध आहेत ते भैरवोपासक व म्हणूनच माहेश्वर होत. जटा, कपाल, भस्म, भगवीं वस्त्रें, कंबरेला घंटांची माळ इत्यादि धारण करून पायांखालच्या वाटेकडे पाहून रस्त्यानें हिंडणारे जोगीही कापालिक माहेश्वरच होत. पण ते सर्व प्रायः परंपराप्राप्त धर्माचें आचरण करणारे असतात. त्यांच्यामध्यें विद्वत्तेचा गंध फारसा नसतो. उदासी, नंगे, संन्यासी इत्यादिकांतही पुष्कळ लोक माहेश्वर पंथी असतात. पण त्या प्रत्येकांतील मतभेद त्यांचा त्यांनाच चांगलासा माहीत नसतो. कांहीं रूढ आचारावरून मात्र ते एकमेकांना परस्परांहून भिन्न समजतात. म्हणजे आम्हां वैदिकांचे वर्ण हल्लीं जसे जातीच्या रूपानें विविध झाले आहेत व त्यामुळें त्यांच्या मूळ तत्त्वाचें विस्मरण होऊन कांहीं विशिष्ट आचारादिकच

-त्या त्या जातींचे निदर्शक होऊन बसले आहेत त्याप्रमाणेंच त्यांचीही स्थिति झाली आहे.

असो; आम्हांला माहेश्वर दर्शनांविषयीं व त्यांच्या अनुयायी लोकांविषयीं जेवढी माहिती उपलब्ध झाली तेवढी या ल्हानशा पुस्तकांत दिली आहे. शैव, स्मार्त, भागवत व वैष्णव यांविषयींही आमच्या वाचनांत जेवढें कांहीं आलें आहे तेवढ्यावरून त्यांची व्यवस्था लावण्याचा यत्न केला आहे. त्यांत कांहीं दोष असल्यास सुज्ञ वाचकांनीं तो आमच्या निदर्शनास आणावा म्हणजे आम्ही तो घालविण्याचा यत्न करूं. दर्शनमालाकार आपणाला सर्वज्ञ समजत नसल्यामुळें त्याच्या समजुतींत व लेखांत दोष असण्याचा असंभव त्यालाही वाटत नाहीं; व त्याचा हा यत्न अनुपम व अखेरचा आहे, असाही त्याला अभिमान नाहीं.

या गोष्टीचा येथें मुद्दाम उल्लेख करण्याचें कारण असें कीं, आमच्या मागच्या वल्लभदर्शनसाराविषयीं सुबोधपत्रिकाकारांनीं आम्हांला अशी सूचना केली आहे. —" ग्रंथ वाचून सार देते वेळीं त्या त्या संप्रदायासंबंधानें जर आजकालचीही माहिती देणें असेल तर ती जपून द्यावी व पूर्ण चौकशी केल्यावांचून देऊं नये. प्रस्तुत दर्शनसाराच्या प्रस्तावनेंत आचार्यभक्त म्हणतातः–‘ ( वल्लभसंप्रदायी लोक ) आमच्या पंढरपुरच्या विठ्ठलाविषयींचा इतिहास मोठया प्रेमानें ऐकतात. कारण श्रीविठ्ठलेश त्यांनाही इष्ट आहे. पण ते आमच्या इकडील वारकरी पंथांतील लोकांप्रमाणें पंढरीच्या वाऱ्या करीत नाहींत. एवढेंच नव्हे तर ते जन्मांतून एकदाही पंढरपूरचें दर्शन घेत नाहींत. ’ वल्लभसंप्रदायी लोकांसंबंधाचें हें विधान आचार्यभक्तांनीं कशाच्या जोरावर केलें आहे ? कारण तें वस्तुस्थितीस अगदीं सोडून आहे. मुंबईंतील भाटये वल्लभसंप्रदायी आहेत व त्यांच्यापैकीं पुष्कळच महाराजांच्या सहकुटुंब भजनीं लागलेले आहेत. तथापि त्यांच्यापैकीं कित्येक लोक पंढरपुरास वारंवार जात असतात आणि याची साक्ष खुद्द पंढरपूर शहर रात्रं-

दिवस देत आहे ! तेथें भाटये लोकांनीं बांधलेल्या धर्मशाळा आहेत व भाटये लोक तेथें जाऊन पुष्कळ दानधर्म त्यांच्या नित्याच्या वहिवाटीस अनुसरून करीत असतात. फार लांब जावयास नको. आमच्या आर्फनेजची इमारत एका भाट्या गृहस्थाची देणगी आहे व आर्फनेज-ला देणग्या देणारांचीं नांवें वाचलीं म्हणजे वल्लभसंप्रदायी लोक जन्मांतून एकदांही पंढरपुरचें दर्शन घेत नाहींत हें म्हणणें किती निराधार आहे तें कोणाच्याही लक्षांत येईल. ”

“ वस्तुस्थिति लपवूं नका.—वल्लभदर्शनसार देतांना आजकालच्या त्या पंथांतील कांहीं गोष्टींचा जर उल्लेख करावयाचा, तर तो लोकांचा ग्रह सपशेल चुकीचा होईल अशा रीतीनें करणें रास्त नव्हे. वल्लभमतानुयायांची श्रद्धा अंधश्रद्धा असते हें सर्वश्रुत आहे. ही श्रद्धा आमच्यासारख्यांच्या दृष्टीनें अंध असते असें नव्हे; तर आचार्यभक्त जर गुजराथींत प्रसिद्ध असलेला पुष्टिमार्ग हा ग्रंथ वाचतील, किंवा महाराज-लायबल केसच्या पुस्तकांतील कांहीं भाग वाचण्याची तसदी घेतील, तर त्यांसही आमच्या मताचाच अनुवाद करावासा वाटेल. हे महाराज उत्तमोत्तम घोड्यांच्या जोड्या पदरीं राखून ऐष आरामांत मग्न असतात; मोटारगाड्या उडवितात, चैन करितात. विद्वत्तेच्या नांवानें ह्यांच्यांत भोपळ्या एवढें पूज्य ! जवळ एखादा शास्त्री असतो, त्याच्यावर ह्यांची सर्व भिस्त. असले हे महाराज आपल्या अनुयायांपासून करापेक्षांही अधिक कर वसूल करून घेतात; पण गुजरात व काठेवाड ह्या प्रांतीं भयंकर दुष्काळ पडला तरी एका पैचाही दानधर्म न करणारे हे महाराज आपल्या ऐष आरामांत कांहींही कमी पडूं देत नाहींत ! यांचा योग्य सत्कार करणें म्हटलें म्हणजे ह्यांच्या जुलमाखालीं मान वांकविणें ! सारांश, आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं जर ह्या महाराजांवरील श्रद्धे-बद्दल दर्शनसाराच्या प्रस्तावनेंत दोन शब्द लिहितां येतात तर ह्या महा-राजांची आजची सर्वपरि खालावलेली स्थितिही वर्णिली पाहिजे. ”

आमच्या बंधूंची ही सूचना आम्हांला अक्षरशः मान्य आहे. पण 'वाल्लभ जन्मांतून एकदाही पंढरपूरचें दर्शन घेत नाहींत,' असें जें आम्ही म्हटलें आहे तें सर्वथा निराधार आहे, असें नाहीं. मुंबईंतील भाट्ये लोक पंढरपूरला अनेकदां जात असतील, दान-धर्मही करीत असतील, आर्फनेजसारख्या संस्थाही बांधीत असतील; वारकरी नसलेले आम्हीही तेथें जातों; ख्रिश्चन, मुसलमान, इत्यादि परधर्माचे लोकही कार्य-परत्वें जातात. पण वादाचा मुद्दा असा आहे कीं वल्लभसंप्रदायांतील भाट्ये वगैरे लोक पंढरपूरला विठोबा हे आपलें इष्ट आहे, या समजुतीनें जातात कीं काय? उत्तर हिंदुस्थानांतील वाल्लभ व त्यांचे महाराज यांतील कोणीही जात नाहींत, हें आम्हांला माहीत आहे. भाट्ये लोक जसे पंढरपूरला जातात तसेच नाशिक, डाकूर, राजापूरची गंगा इत्यादि पूर्व, उत्तर व पश्चिम दिशेंतील पवित्र स्थळींही जातात व त्या त्या ठिकाणींही त्यांचा धर्मदाय फार मोठा होतो. भाट्ये लोकांच्या धर्मशाळा हिंदुस्थानांतील दुसऱ्याही अनेक पवित्र जागीं आहेत. तस्मात् वाल्लभ व स्वतः वल्लभाचार्यांचे वंशज पंढरपूर हें आमच्या इष्ट उपास्याचें निवासस्थान आहे, अशा भावनेनें जोंवर तेथें जात नाहींत, तोंवर आमच्या म्हणण्यास कांहीं बाध येत नाहीं.

'वस्तुस्थिति लपवूं नका'—असा उपक्रम करून आमच्या बंधूंनीं जें लिहिलें आहे त्याविषयीं आम्हांला एवढेंच सांगावयाचें आहे कीं वरील सर्व गोष्टी आम्हांला जरी माहीत असल्या तरी त्यांचा दर्शनसारांत उल्लेख करून विनाकारण क्षोभ उत्पन्न करण्याचें आमचें शील नाहीं. त्यांच्या श्रद्धेविषयीं आम्ही जें लिहिलें आहे तें वस्तुतः अंधश्रद्धेविषयींच आहे; विचारपूर्वक सात्त्विक श्रद्धेविषयीं नाहीं.

असो, ही अल्प सेवा आचार्यचरणीं अर्पण करून आम्ही ही प्रस्तावना संपवितों.

भाद्रपद कृष्ण १३ गुरुवार १८३६
पुणें २४१ सदाशिव पेठ

वि. वा. बापट.

# विषयानुक्रमणिका.


| क्रमांक. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | नकुलीशदर्शनसार .... .... .... .... .... | १ |
| २ | शैवदर्शनसार .... .... .... .... .... | १० |
| ३ | पाशांचें वर्णन .... .... .... .... .... | २२ |
| ४ | प्रत्यभिज्ञादर्शनसार .... .... .... .... .... | २४ |
| ५ | रसेश्वरदर्शनसार .... .... .... .... .... | ३४ |
| ६ | मतभेद .... .... .... .... .... .... | ४३ |

ब्रह्मविद्याग्रन्थरत्नमाला, वर्ष दुसरें, अंक नववा.

दर्शन आठवें.

# श्रीमाहेश्वरदर्शनसार.

## ( समतभेद. )

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीसद्गुरवे नमः । वेदान्तसंप्रदायप्रवर्तक ऋषि व आचार्य यांस वंदन करून स्वबोधशुद्ध्यर्थ व लोकोपकारार्थ क्रमानें माहेश्वरदर्शनसारांतील नकुलीश—पाशुपत-दर्शनसार, शैवदर्शनसार, प्रत्यभिज्ञादर्शनसार, व रसेश्वरदर्शनसार लिहितों.

## १ नकुलीशदर्शनसार.

यापूर्वीं प्रसिद्ध तीन वैष्णवांचीं मतें तीन दर्शनांत प्रतिपादिलीं आहेत. पण त्यांतील पूर्णप्रज्ञांचें द्वैतमत साक्षात् व दुसरीं दोन वैष्णव मतें परंपरेनें ‘ दासत्व ’ या संज्ञेस पात्र आहेत. म्हणजे तें मत जीव परमात्म्याचा दास आहे, असें सांगतें. त्यामुळें त्या मतीं पारतंत्र्य दुःखाचें निवारण होत नाहीं. कारण जेथें दासत्व तेथें पारतन्त्र्य व जेथें पारतन्त्र्य तेथें दुःख नियमानें राहतें. त्यामुळें तें जीवाला अत्यंत इष्ट असलेल्या दुःखान्ताला कारण होत नाहीं. जीवानें स्वतःला दास मानल्यामुळें त्याला इष्ट असलेला दुःखाचा नाश संभवत नाहीं. त्यामुळें दुसऱ्या कित्येकांना तें मत आवडत नाहीं. त्यांना परमात्म्याच्या परम ऐश्वर्याची इच्छा असते. वैष्णव मताचे अनुयायी मुक्त होत नाहींत. कारण ते परतंत्र असतात, आणि परतंत्र असल्यामुळेंच आम्हां—तुम्हांप्रमाणें पारमैश्वर्यरहित असतात. पण जे मुक्तात्मे असतात ते परमेश्वरगुणसंबंधी असतात. त्यांच्यामध्यें परमेश्वराचे गुण असतात. कारण तेही

परमेश्वराप्रमाणें पुरुष असून समस्त दुःखबीजरहित असतात, असें अनुमान करितां येतें, असें समजणारे कित्येक माहेश्वर पाशुपत शास्त्राचा आश्रय करितात. तें शास्त्र परमपुरुषार्थाच्या साधनभूत पांच अर्थांचें प्रतिपादन करणारें आहे. त्या शास्त्राचें ' अथातः पशुपतेः पाशुपत-योगविधिं व्याख्यास्यामः ' हें पहिलें सूत्र आहे. त्यांतील पहिला अथ शब्द पूर्वप्रकृत शिष्यप्रश्नाच्या अपेक्षेनें आहे. म्हणजे गुरूला शिष्यानें प्रश्न केला असतां ' त्यानंतर ' असा त्या शब्दाचा अर्थ आहे.

गुरूचें स्वरूप गणकारिकेंत असें सांगितलें आहे.—विशेषेंकरून जाणण्यास योग्य असलेले आठ पंचक व वृत्तित्रयरूप एक गण अशा या नऊ गणांना जाणणारा संस्कर्ता गुरु म्हटला जातो. लाभ, मल, उपाय, देश, अवस्था, विशुद्धि, दीक्षाकारी व बल हे आठ पंचक व भैक्ष्यादि तीन प्रकारचें उपजीविकासाधन, मिळून नवगण होतो. त्यांतील विधान केलें जाणारें उपायफळ हाच लाभ; तो ज्ञान, तप, नित्यत्व, स्थिति व शुद्धि असा पांच प्रकारचा आहे. आत्म्याचा आ-श्रय करून राहिलेला दुष्टभाव हाच मळ आहे. तो मिथ्याज्ञान, अधर्म, सक्ति [ आसक्ति ], हेतु व च्युति हें पांच प्रकारचें पशुत्व तन्मूलक आहे. साधकाच्या शुद्धीला कारण होणारा उपायही पांच प्रकारचा आहे.—वासचर्या, जप, ध्यान, सदा रुद्राचें स्मरण व लाभांचें संपादन हे पांच उपाय आहेत. ज्याच्या योगानें अर्थानुसंधानपूर्वक ज्ञान व तप यांची वृद्धि होते तो देश गुरु, जन, गुहादेश, श्मशान व रुद्र असा पांच प्रकारचा आहे. लाभप्राप्ति होईपर्यंत जें एकत्र अवस्थान तीच अव-स्था व्यक्त, अव्यक्त, जप, आदान व निष्ठा अशी पांच प्रकारची आहे. मिथ्याज्ञानादिकांचा अत्यंत निषेध हीच विशुद्धि आहे. अज्ञानाचा नाश, संगाचा नाश, संग करविणाऱ्या हेतूचा नाश, च्युतीचा नाश व पशु-त्वाचा नाश अशी ती विशुद्धि पांच प्रकारची आहे. द्रव्य, काल, क्रिया, मूर्ति व गुरु हें दीक्षाकारि पंचक आहे. गुरुभक्ति, प्रसाद,

बुद्धीचा शीतोष्णादि द्वंद्वजय, धर्म व अप्रमाद असें पांच प्रकारचें बल आहे.

वर सांगितलेले मिथ्याज्ञानादि पंच मल क्षीण करण्याकरितां मान व अमान या दोघांशींही विरोधी असलेले अन्नार्जनाचे जे उपाय त्या वृत्ती होत. त्या भैक्ष्य, उत्सृष्ट व यथालब्ध या नांवांच्या तीन आहेत. भिक्षेनें मिळालेलें जें अन्न तें भैक्ष्य; टाकून दिलेलें जें अन्न तें उत्सृष्ट व याचना न करितां यदृच्छेनें मिळालेलें जें अन्न तें यथालब्ध. असो; या नवगणाचें अधिक वर्णन मूळ ग्रंथावरूनच कळण्यासारखें आहे. पण या दर्शनाचा मूळ ग्रंथ आम्हांला उपलब्ध नाहीं.

वरील सूत्रांतील दुसऱ्या ' अतः ' शब्दानें दुःखान्ताचें प्रतिपादन केलें आहे. कारण तो शब्द आध्यात्मिकादि त्रिविध दुःखाच्या नाशाविषयींच्या प्रश्नाकरितां योजला आहे. ' पशु ' शब्दानें कार्याचें प्रतिपादन केलें आहे; कारण तो शब्द परतंत्र या अर्थीं रूढ आहे. ' पति ' शब्दानें कारणाचें प्रतिपादन केलें आहे. कारण ' ईश्वरः पतिरीशिता ' इत्यादि वाक्यांत जगत्कारणभूत ईश्वर या अर्थीं पति शब्दाचा उपयोग केला आहे. योग व विधि हे शब्द तर प्रसिद्ध आहेत. दुःखांचा अन्त अनात्मक व सात्मक असा दोन प्रकारचा आहे. सर्व दुःखांचा अत्यंत उच्छेद हा अनात्मक दुःखान्त आणि दृक्शक्ति व क्रियाशक्ति एतल्लक्षण जें ऐश्वर्य तो सात्मक दुःखान्त होय. दृक्शक्ति, वस्तुतः एकरूप असूनही निरनिराळ्या विषयांमुळें ती पांच प्रकारची आहे, असें म्हटलें जातें. दर्शन, श्रवण, मनन, विज्ञान व सर्वज्ञत्व हे तिचे प्रकार होत. सूक्ष्म, आड असलेलें, दूर असलेलें इत्यादि सर्व चाक्षुष ज्ञान व स्पर्शादि विषयक ज्ञान हेंच दर्शन आहे. सर्वशब्दविषयक सिद्धिज्ञान हें श्रवण, सर्वचिन्ताविषयक सिद्धिज्ञान हें मनन, समस्तशास्त्रविषयक- ग्रंथतः व अर्थतः जें सिद्धिज्ञान तेंच विज्ञान, व सर्व उक्त व अनुक्त विषयांविषयीं संक्षिप्त व विस्तृत असें जें तत्त्वव्याप्त

व सदोदित सिद्धिज्ञान तेंच सर्वज्ञत्व आहे. अशा या पांच प्रकारच्या दृक्शक्तीलाच धीशक्ति असेंही नांव आहे.

क्रियाशक्ति ही मूळची एकच जरी असली तरी ती गौणवृत्त्या तीन प्रकारची म्हटली जाते. मनोजवित्व, कामरूपित्व व विक्रमणधर्मित्व हे तिचे तीन प्रकार आहेत. अतिशय शीघ्र करण्याचें जें शील तें मनोजवित्व ( म्हणजे अतिशय वेगयुक्तत्व ) आहे. कर्मादिकांची अपेक्षा न करितां स्वेच्छेनेंच अनेक प्रकारचीं सलक्षण ( एकसारखीं ) व विलक्षण रूपें धारण करणें हेंच कामरूपित्व आहे. ज्याचीं इंद्रियें लीन झालेलीं आहेत, ज्यानें आपल्या इंद्रियांना विषयांपासून निवृत्त केलें आहे अशा पुरुषाचाही निरतिशय ऐश्वर्याशीं संबंध होणें हेंच विक्रमणधर्मित्व आहे. क्रियाशक्ति ही अशा प्रकारची आहे.

जें अस्वतंत्र असलेलें सर्व कार्य तें विद्या, कला व पशु असें तीन प्रकारचें आहे. त्यांतील विद्या हा पशूचा गुण आहे. ती विद्या बोधस्वभाव व अबोधस्वभाव अशी दोन प्रकारची आहे. बोधस्वभाव विद्येचे विवेकप्रवृत्ति व अविवेकप्रवृत्ति असे दोन भेद आहेत. त्यांतील प्रत्येक प्रमाणानें व्यक्त होणारी जी विवेकप्रवृत्ति तिला चित्त असें म्हणतात. कारण सर्व प्राणी या चित्ताच्या योगानेंच बाह्यविषयरूप प्रकाशानें अनुगृहीत झालेल्या विवेचित व अविवेचित विषयाला एकसारखेंच जाणतात. पशूच्या विषयधर्मांना न जाणणारी जी विद्या ती अबोधात्मिका होय. त्या विद्येमुळेंच स्वशास्त्र सांगावें लागतें.

कला चेतनाच्या अधीन असते. ती स्वतः अचेतन असते. तिचे कार्यसंज्ञक कला व कारणसंज्ञक कला असे दोन प्रकार आहेत. पृथिव्यादि पांच तत्त्वें व रूप-रसादि पांच गुण अशी कार्यसंज्ञक विद्या दहा प्रकारची आहे. कारणाख्य कला तेरा प्रकारची आहे, पांच ज्ञानेंद्रियें, व पांच कर्मेंद्रियें, व अन्तःकरणत्रय असे ते तेरा प्रकार होत. अन्तःकरण वस्तुतः एकच आहे. तथापि निश्चय, अभिमान व संकल्प या

त्रिविध व्यापारामुळें तें बुद्धि, अहंकार व मन या नांवांनीं त्रिविध झालें पाहिजे.

पशुत्वाशीं जो संबंध ठेवतो तो पशु होय. पशुत्व म्हणजे पारतन्त्र्य. तो साञ्जन व निरञ्जन असा दोन प्रकारचा आहे. शरीर, इंद्रियें इत्यादिकांशीं जो संबंध ठेवतो तो साञ्जन व त्यांच्याशीं जो संबंध ठेवीत नाहीं तो निरञ्जन. त्याचा अधिक विचार पंचार्थभाष्यदीपिका इत्यादि ग्रंथांत केला आहे. सर्व जगाची उत्पत्ति व संहार यांवर जें अनुग्रह करणारें तें कारण होय. तें जरी एकच आहे तरी गुण व कार्य यांच्या भेदाच्या अपेक्षेनें त्याचाही ‘ पतिः आद्यः ’ इत्यादि नांवांनीं भेद सांगितला आहे. निरतिशय दृक्-क्रियाशक्तिमत्वरूप ऐश्वर्याशीं नित्य संबंधित्व हेंच पतित्व आहे. म्हणजे दृक्शक्ति व क्रियाशक्ति या ऐश्वर्याशीं नित्य संबंध ठेवणें, यालाच पतित्व म्हणतात. त्याचप्रमाणें स्वाभाविक ऐश्वर्याशीं संबंध असणें हेंच आद्यत्व आहे. आदर्शकारादि शास्त्रकारांनीं याविषयीं सविस्तर वर्णन केलें आहे.

चित्ताच्या द्वारा आत्मा व ईश्वर यांचा संबंध होणें हाच योग आहे. तो क्रियालक्षण व क्रियोपरमलक्षण असा दोन प्रकारचा आहे. जप, ध्यान इत्यादि प्रकारचा जो योग तो क्रियारूप योग; आणि ज्ञान, गति इत्यादि नांवाचा हा क्रियोपरमलक्षण योग आहे. त्यांत सर्व क्रियांचा उपशम झालेला असतो. धर्म व अर्थ यांचा साधक असा जो व्यापार तो विधि. प्रधानभूतविधि व गुणभूतविधि असे त्याचे दोन प्रकार आहेत. प्रधानविधि साक्षात् धर्माचा हेतु होतो. त्यालाच चर्या, असें म्हणतात. ती चर्या व्रत व द्वारें अशी दोन प्रकारची आहे. भस्मस्नान भस्मशयन, उपहार, जप व प्रदक्षिणा असें पांच प्रकारचें व्रत आहे. कारण त्याविषयीं भगवान् नकुलीशानें असें सांगितलें आहे.—त्रिकाल भस्मानें स्नान करावें. भस्मांत शयन करावें. उपहार म्हणजे नियम. तो सहा अंगांनीं युक्त आहे. त्यांविषयीं ‘ हसित-गीत-नृत्य-हुडुक्कार-नम-

स्कार-जप्य षडङ्गोपहारेण उपतिष्ठेत' असें सूत्र आहे. त्यांचा अर्थ, हसणें, गाणें, नृत्य, हुडुक्कार, नमस्कार व जप्य मंत्र या षडंग उपहारानें महेश्वराचें उपस्थान करावें. कंठ व ओंठ यांना कंपित करून मोठ्यानें 'हहहहह' असें हंसणें, हेंच हसित; गांधर्व शास्त्राच्या नियमानुसार महेश्वरसंबंधी गुणधर्मादि निमित्तांचें चिंतन करणें, हेंच गाणें; नाट्यशास्त्राच्या अनुसार तालावर पावलें टाकणें, हातांनीं अभिनय करणें, मान, डोळे, तोंड उर, खांदे, मांड्या इत्यादि अंग प्रत्यंग उपांगसहित हावभाव करणें, हें नृत्य; जी व तालु यांच्या संयोगानें होणारा जो वृषभाच्या नादासारखा पुण्यकर नाद तो हुडुक्कार होय. वेदांतील वषट् या शब्दाप्रमाणें 'हुडुक्' हा शब्दाचा अनुकार आहे. जेथें साधारण लोक पुष्कळ असतील तेथें हें सर्व गु पणें करावें. आणि बाकीचें सर्व उपासन प्रसिद्धपणें करावें.

चर्येचा द्वार या नांवाचा जो दुसरा प्रकार त्याचे क्राथन, स्पन्दन, मन्दन, शृंगारण, अवितत्करण व अवितद्भाषण असे सहा प्रकार आहेत. त्यांतील झोंप न लागलेल्या पुरुषानेंही झोंप लागल्याप्रमाणें दाखविणें हें क्राथन; वायु झाल्याप्रमाणें शरीरावयवांना कांपविणें हेंच स्पंदन; पादेंद्रिय निर्बल झाल्याप्रमाणें गमन करणें हेंच मंदन; पुरुष यौवन व रूप यांनीं युक्त असलेल्या कामिनीला पाहून मी कामुक आहें, असें जशा विलासांनीं दाखवितो तसे विलास करणें, हें शृंगारण; जसा एकादा कार्याकार्यज्ञानशून्य पुरुष लोकांनीं निंद्य मानलेलेंही कर्म करतो त्याप्रमाणें लोकनिंद्य कर्म करणें, हें अवितत्करण आहे. परस्पर विरुद्ध व व्यर्थ शब्द बोलणें याला अवितद्भाषण म्हणतात.

अनुस्नान, निर्माल्य, लिंगधारण, इत्यादि गुणभूत विधि चर्या नांवाच्या पहिल्याप्रकारच्या विधीवर अनुग्रह करणारा आहे. तो उच्छिष्टभक्षणादि दोषामुळें प्राप्त होणाऱ्या अयोग्यताजनक दोषाचें निवर्तन करणारा आहे. किंबहुना तसल्या दोषांची निवृत्ति व्हावी म्हणून त्याचें

विधान केलेलें आहे. सूत्रकारानें ' अनुस्नाननिर्माल्यलिङ्गधारी ' या सूत्रांत त्या गुणविधीचा निर्देश केला आहे.

वर ' सर्वज्ञत्व ' या नांवाच्या दृक्शक्तीचें स्वरूप सांगतांना ' संक्षेप व विस्तार यांच्या योगानें ' इत्यादि म्हटलें आहे. त्यांतील समाज ( संक्षेप ) म्हणजे नुस्तें धर्मी पदार्थांचें कथन. नैयायिकांचा उद्देश व माहेश्वरांचा हा समास एकसारखाच आहे. तो समास वरील पहिल्या सूत्रांतच केला आहे; आणि त्या पांच पदार्थांचें प्रमाणपूर्वक पृथक् कथन करणें याला विस्तार म्हणतात. तो त्याच सूत्रावरील राशीकरांच्या भाष्यांत केला आहे. त्याचें यथासंभव लक्षणपूर्वक अगदीं पृथक्पणें कथन करणें हा विभाग आहे. त्यांत दुसऱ्या विहित शास्त्रांहून यांत अधिक गुण आहेत असें सांगणें हाच विशेष आहे. कसा तो पहा—इतर शास्त्रांत दुःखाची निवृत्ति हाच दुःखान्त आहे. पण या शास्त्रांत परमेश्वरभावाची प्राप्ति हा दुःखान्त आहे. इतर शास्त्रांत पूर्वी नसून पुढें होणारें तें कार्य, असें म्हटलें आहे. पण येथें नित्य पश्वादि हें कार्य आहे. इतर शास्त्रांत कारण सापेक्ष मानलेलें आहे. म्हणजे एका कार्याच्या अपेक्षेनें जें कारण असतें तेंच त्याच्या कारणाच्या अपेक्षेनें कार्य होतें. पण आमच्या या शास्त्रांत कारण काय तो एक निरपेक्ष भगवान्च. इतर शास्त्रांत योग कैवल्यादि फळ देणारा आहे. व येथें तो परमेश्वरभावाच्या प्राप्तीनें दुःखाचा अन्त हें फळ देणारा आहे. इतर शास्त्रांत स्वर्गादि फळें पुनरावृत्ति ( पुनर्जन्म ) देणारीं आहेत, असें सांगितलें आहे, आणि येथें परमेश्वराचें सामीप्य हें फल अपुनरावृत्ति करणारें आहे. अपुनरावृत्ति म्हणजे मोक्षच.

' अहो पण निरपेक्ष परमेश्वराला कारण म्हणणें हें मोठेंच इंद्रजाल आहे. कारण तसें मानल्यास कर्में व्यर्थ होणें व सर्व कार्यें एकाच वेळीं उत्पन्न होणें, हे दोन दोष येतात, ' असें कोणी म्हणेल तर तें बरोबर नाहीं. कारण ही शंका वरील प्रतिपादनाला धरून नाहीं. अहो,

भगवान् निरपेक्ष कारण आहे, असें म्हटल्यावर कर्में व्यर्थ झालीं तर त्यांत काय बिघडलें? त्यांचें कांहीं प्रयोजनच नाहीं, असें होणें हाच त्यावर येणारा मोठा दोष आहे, म्हणून जर म्हणाल तर तें बरोबर नाहीं. कारण केवल कर्माचें कांहीं प्रयोजनच नसतें. तर ईश्वरेच्छेनें अनुगृहीत झालेलें कर्मच सप्रयोजन होतें, तसलें कर्मच फळ देण्यास समर्थ असतें, आणि त्या परमेश्वराच्या अनुग्रहानें रहित असलेलें कर्म कदाचित् निष्फळ होण्याचाही संभव असतो, असें ययातिप्रभृति समर्थ पुरुषांचीं कर्में निष्फळ झाल्याचें पाहून निश्चय होतो. पण असें म्हटल्यानें कर्मामध्यें मुळींच कोणाची प्रवृत्ति होणार नाहीं, असेंही समजण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण फल जरी ईश्वरायत्त असलें तरी शेतकरी जमीन नांगरणें, या कर्मामध्यें प्रवृत्त होतोच. शिवाय केवल भोगयोनींत उत्पन्न झालेल्या बैलादि पशूंची प्रवृत्ति केवल ईश्वरेच्छेच्या अधीन असते. तसेंच, स्वतः परमेश्वर पूर्ण काम असल्यामुळें त्याला कर्मांच्या योगानें प्राप्त होणाऱ्या फलाची इच्छाच नसते. त्यामुळें कर्म व्यर्थ होतें, ही भीति बाळगण्याचें कांहीं कारणच नाहीं.

बरें, सर्व कार्यांची एकाच वेळीं उत्पत्ति होईल, असा जो दुसरा दोष वर दाखविलेला आहे तोही अयुक्त आहे. कारण परमेश्वर अचिन्त्यशक्तिमान् आहे. त्यामुळें त्याच्या इच्छेप्रमाणें प्रवृत्त होणाऱ्या अव्याहत क्रियाशक्तीकडून सर्व कार्यें योग्य क्रमानें केलीं जातात, असें आम्ही मानतों. त्यासाठींच संप्रदायवेत्त्यांनीं—

कर्मादिनिरपेक्षस्तु स्वेच्छाचारी यतो ह्ययम् ।
ततः कारणतः शास्त्रे सर्वकारणकारणम् ॥

अर्थ—ज्या अर्थीं हा परमेश्वर कर्मादिनिरपेक्ष व स्वेच्छाचारी आहे त्याअर्थीं शास्त्रांत त्याला सर्व कारणांचं कारण असें म्हटलें आहे. सर्व प्रपंचाचें कारण अशी जी क्रियाशक्ति तिचेंही महेश्वर कारण आहे.

अर्थात् त्याचें कारणत्व, निरपेक्ष आहे व त्याच्या क्रियाशक्तीच्यायोगानें सर्व कार्यें नियमितपणें होतात.

अहो पण दुसऱ्या दर्शनांतही ईश्वराच्या ज्ञानानें मोक्ष मिळतोच. मग याच शास्त्रांत असा कोणता मोठा विशेष आहे, म्हणून म्हणाल तर तसें म्हणूं नका. कारण, निर्वाणाचें कारण आहे ? नुस्तें ईश्वरविषयक ज्ञानच कारण आहे कीं त्याचा साक्षात्कार कारण आहे, कीं यथावत् तत्त्वनिश्चयच निर्वाणाचें कारण आहे ? यांतील पहिलें कारण तर मुळींच संभवत नाहीं. कारण प्राकृतजनांप्रमाणें शास्त्रावाचूनही देवांचा अधिपति महादेव आहे, असें ज्ञान होतांच सर्वांना मोक्ष मिळूं लागेल ! व मग शास्त्राच्या अभ्यासाचें कांहीं कारणच रहाणार नाहीं आणि अभ्यास जरी केला तरी तो व्यर्थ होईल ! ! बरें, ईश्वरसाक्षात्कारच निर्वाणाचें कारण आहे म्हणून म्हटलें तर तेंही उपपन्न होत नाहीं- कारण अनेक दुष्कर्मांमुळें ज्यांची दृष्टि मलिन झाली आहे अशा स्थूल. दृष्टि पशूंना परमेश्वराचा साक्षात्कार होणें अनुपपन्न आहे. बरें यथावत् तत्त्वनिश्चय हेंच निर्वाणकारण आहे, हा तिसरा पक्ष घ्यावा तर अनायासानेंच आमच्या मतांत प्रवेश होतो. कारण पाशुपत शास्त्रावाचून यथावत् तत्त्वनिश्चय होऊं शकत नाहीं. त्याविषयीं आचार्यांनीं असें म्हटलें आहे—

ज्ञानमात्रे वृथाशास्त्रं साक्षाद्दृष्टिस्तु दुर्लभा ।
पञ्चार्थादन्यतो नास्ति यथावत्तत्त्वनिश्चयः ॥

अर्थ—नुस्तें ज्ञानच मोक्षाचें कारण आहे, असें जर म्हटलें तर शास्त्र व्यर्थ होतें. परमेश्वराचा साक्षात्कार तर दुर्लभ आहे. यास्तव या आमच्या पञ्चार्थ शास्त्रावाचून दुसऱ्या कोणत्याही शास्त्रानें यथावत् तत्त्वनिश्चय होऊं शकत नाहीं. यास्तव ज्यांना पुरुषार्थाची इच्छा असेल त्या श्रेष्ठ पुरुषांनीं पञ्चार्थप्रतिपादन करणाऱ्या पाशुपतशास्त्राचा आश्रय करावा.

इति नकुलीशपाशुपतदर्शनम् ।

## २ शैवदर्शनसार.

पण हा पाशुपतांचा पक्ष योग्य नाहीं. कारण पाशुपत कर्मादिकांची अपेक्षा न करणारा परमेश्वर जगाचें कारण आहे, असें म्हणतात. पण या पक्षीं परमेश्वरावर वैषम्य व नैर्घृण्य हे दोष येतात. ( वैषम्य म्हणजे विषमता, व नैर्घृण्य म्हणजे निर्दयता. ) कारण तो कर्मादि कोणत्याही कारणावाचूनच कांहीं जीवांना अत्यंत सुखी करतो; कांहीं जीवांना अतिशय दुःखी करतो. कांहींना किंचित् सुखी व किंचित् दुःखी करतो. यास्तव पाशुपत मत अयोग्य आहे, असें समजणारे दुसरे कित्येक माहेश्वर शैवागमसिद्धान्ततत्त्वच खरें व प्रामाणिक आहे, असें जाणतात. व त्यांत सांगितल्याप्रमाणें कर्मादि सापेक्ष परमेश्वरच कारण आहे, या पक्षाचा अंगीकार करितात. अर्थात् ते इतर मतांचा तिरस्कार करितात. त्यांच्या पक्षीं तन्त्रतत्त्वज्ञांनीं सांगितल्याप्रमाणें पति, पशु व पाश असे तीन पदार्थ आहेत.

त्रिपदार्थं चतुष्पादं महातन्त्रं जगद्गुरुः ।
सूत्रेणैकेन संक्षिप्य प्राह विस्तरतः पुनः ॥

अर्थ—ज्यांत तीन पदार्थ सांगितले आहेत व चार पादांचें वर्णन केलें आहे तें महातन्त्र जगद्गुरु एकाच सूत्रानें संक्षेपतः सांगून तेंच पुनः सविस्तर सांगता झाला. पति, पशु व पाश हे तीन पदार्थ वर सांगितलेच आहेत. विद्या, क्रिया, योग व चर्या हे चार पाद आहेत. पशु स्वतंत्र नसतात व पाश जड असतात. यास्तव त्या दोघांहूनही विलक्षण असलेल्या पतीचा वरील पदार्थोद्देशांत प्रथम निर्देश केला आहे. चेतनत्व हा धर्म पति व पशु यांना साधारण आहे. यास्तव पतीच्या मागोमाग पशूचा निर्देश केला आहे. त्यानंतर बाकी राहिलेल्या पाशांचा निर्देश आहे. याप्रमाणें पदार्थांच्या क्रमाची उपपत्ति लागते.

त्याचप्रमाणें पूर्वोक्त चार पादांच्या क्रमाचीही उपपत्ति अशी आहे.

दीक्षा परम पुरुषार्थाला कारण होणारी आहे. पण ती पशु, पाश व ईश्वर यांच्या स्वरूपाचा निर्णय करण्याचा जो उपाय त्या मंत्र, मंत्रेश्वर इत्यादिकांच्या माहात्म्याचा निश्चय करविणाऱ्या ज्ञानावाचून संपादन करतां येत नाहीं. यास्तव तिचें ज्ञान करून देणाऱ्या विद्यापदाचा निर्देश प्रथम केला आहे. अनेक प्रकारच्या सांगदीक्षाविधींचें प्रदर्शन करणाऱ्या क्रियापादाचा उल्लेख त्याच्या मागून केला आहे. योगावाचून इष्ट प्राप्ति होत नाहीं. यास्तव सांग योगाचें ज्ञांन करून देणाऱ्या योगपादाचा उल्लेख त्याच्या मागून केला आहे आणि विहित आचरण व निषिद्धवर्जन यावाचून वरील योगाचाही निर्वाह होत नाहीं, यास्तव त्याचें प्रतिपादन करणाऱ्या चर्यापादाला सर्वांच्या शेवटीं योजिलें आहे पादांच्या क्रमाची ही अशी उपपत्ति आहे.

या दर्शनांत पतिशब्दाचा शिव हा अर्थ आम्हांला अभिमत आहे. मुक्तात्मे, विद्येश्वर इत्यादि दुसऱ्याही पुष्कळांना शिवत्व जरी असलें तरी ते परमेश्वरपरतंत्र असतात. त्यामुळें त्यांना स्वातंत्र्य नसतें. म्हणूनच त्याचें अनुकरण करणाऱ्या भुवनादि भावांना विशिष्ट आकार असल्यामुळें त्यांना कार्यत्व आहे, असें ज्ञान होतें; आणि त्या कार्यत्वावरूनच ते भाव कोणा बुद्धिमत्पुरुषाकडून निर्माण केले गेलेले असावे असें अनुमान होतें. या अनुमानावरूनच परमेश्वराची सिद्धि होते.

‘ अहो पण अगोदर या देहाचेंच कार्यत्व सिद्ध होत नाहीं. कारण हा देह केव्हांही कोणाकडून केला जात असल्याचें कोठेंही दिसत नाहीं. ’ असें म्हणाल तर तें खरें आहे. पण देहाला कोणी करीत असल्याचें जरी न आढळलें तरी त्यावरून त्याचा कोणी कर्ताच नाहीं, असें म्हणणें अयुक्त आहे. कारण त्याला अनुमेयत्व असूं शकेल. म्हणजे त्याची सिद्धि अनुमानानें होऊं शकेल. जसें—देहादिक कार्यच असणें योग्य आहे. कां कीं त्याला विशिष्ट आकार आहे; किंवा त्याला विनश्वरत्व आहे. घटादिकांप्रमाणें या अनुमानानें देहाच्या कार्यत्वाची

सिद्धि झाली म्हणजे त्याच्या बुद्धिमान् कर्त्याचीही अनुमानप्रमाणानेंच सिद्धि होते. जसें—देहादिक सकर्तृक आहे. कारण त्याला कार्यत्व आहे. घटाप्रमाणें हें परमेश्वराविषयींचें अनुमान यथार्थ आहे, असें शैवांच्या दुसऱ्या ग्रंथांतून बरेंच वर्णन केलें आहे. पण त्याचा येथें फारसा उपयोग नसल्यामुळें आम्ही विस्तार करीत नाहीं.

अज्ञो जन्तुरनीशोऽयमात्मनः सुखदुःखयोः ।
ईश्वरप्रेरितो गच्छेत्स्वर्गं वा श्वभ्रमेव वा ॥

अर्थ-हा अज्ञ जन्तु आपल्या सुखदुःखांविषयीं अस्वतंत्र आहे. ईश्वरानें ज्याला प्रेरणा केली आहे असा तो स्वर्गाला जाईल अथवा खळग्यांतही जाईल, या न्यायानें प्राण्यांनीं केलेल्या कर्मांच्या अपेक्षेनें परमेश्वराचें कर्तृत्व उपपन्न होतें. पण तो कर्मसापेक्ष कर्ता आहे, असें मानल्यास त्याचें स्वातंत्र्य नष्ट होतें, म्हणून म्हणाल तर तें बरोबर नाहीं. कारण कर्त्याला कारणाची अपेक्षा जरी असली तरी त्यामुळें त्याच्या स्वातंत्र्याची हानि होते असें कोठेंच आढळत नाहीं. राजा एकाद्यावर प्रसन्न होऊन त्याला कोषाध्यक्षाच्या द्वारा पारितोषिक देतो. पण तें देतांना त्याला कोषाध्यक्षाची ( खजिनदाराची ) अपेक्षा जरी असली तरी त्याच्या स्वातंत्र्याची हानि होत नाहीं. सिद्ध गुरूंनीं याविषयीं असें म्हटलें आहे.

स्वतन्त्रस्याप्रयोज्यत्वं करणादि प्रयोक्तृता ।
कर्तुःस्वातन्त्र्यमेतद्धि न कर्माद्यनपेक्षता ॥

अर्थ—कर्ता स्वतंत्र असतो, असें पाणिनि मुनींनींही ‘ स्वतन्त्रःकर्ता ’ (अष्टा० अ० १ पा० ४ सू. ५४ ) या सूत्रांत सांगितलें आहे. त्या कर्त्यानें दुसऱ्या कोणाच्या प्रेरणेचा विषय न होणें व कारणादिकांना प्रेरणा करणें, हेंच त्याचें स्वातन्त्र्य आहे. त्याला कर्मादिकांचीही अपेक्षा नसणें हें स्वातंत्र्य नव्हे. तात्पर्य, कर्त्याला साधनादिकांची जरी अपेक्षा असली तरी तो त्यांचा प्रेरक असतो व स्वतः दुसऱ्या कोणाकडून प्रेरणा केला

जात नाहीं. यास्तव तो स्वतंत्र आहे. अर्थात् त्या त्या कर्माशयानुसार भोग, त्याचें साधन, त्याचें उपादान इत्यादि विशेषांना जाणणारा कर्ता अनुमान शब्द इत्यादि प्रमाणांनीं सिद्ध होतो ही गोष्ट निर्विवाद आहे. त्यासाठींच पूज्य बृहस्पतींनीं—

इह भोग्यभोगसाधनतदुपादानादि यो विजानाति ।
तमृते भवेन्नहीदं पुंस्कर्माशयविपाकज्ञम् ॥ १ ॥

अर्थ–या सृष्टींतील भोग्य विषय, त्यांचा भोग, भोगाचें साधन, त्याचें उपादान इत्यादि जो जाणतो त्या पुरुषाचें कर्म, संस्कार व विपाक यांस जाणणारावाचून हें विचित्र जग होऊं शकणार नाहीं. असें म्हटलें आहे. दुसऱ्याही एका जागीं—

बुद्धिमत्कर्तृकं सर्वं बुद्धिमत्पूर्वकर्तृकम् ।
कार्यत्वादावयोः सिद्धं कार्यं कुम्भादिकं यथा ॥

अर्थ–हें सर्व बुद्धिमान् कर्त्याकडूनच केलें जातें; व हें सर्व बुद्धिमत्कर्तृपूर्वक आहे. कारण घटादि दुसऱ्या कार्यांप्रमाणें हेंही कार्य आहे. आम्हां दोन्ही वाद्यांच्या मतीं घटादि कार्य आहे व त्यामुळेंच तें बुद्धिमत्कर्तृपूर्वक आहे, हें ठरलेलें आहे, असें म्हटलें आहे. तो कर्ता सर्वात्मक असल्यामुळेंच त्याचें सर्वज्ञत्वही सिद्ध होतें. कारण अज्ञ कांहीं करण्यास समर्थ नसतो. म्हणूनच श्रीमन्मृगेंद्रांनीं म्हटलें आहे.—

सर्वज्ञः सर्वकर्तृत्वात्साधनाङ्गफलैः सह ।
यो यज्जानाति कुरुते स तदेवेति सुस्थितम् ॥

अर्थ–तो जगत्कर्ता सर्वकर्ता असल्यामुळें सर्वज्ञ आहे. कारण साधन अंग व फल यांसह जो जें जाणतो तोच तें करूं शकतो, ही गोष्ट व्यवहारांत सिद्ध झालेली आहे.

वादी–बरें याचा कर्ता स्वतंत्र ईश्वर आहे, असेंच कां होईना ! पण तो अशरीर नाहीं. तर सशरीर आहे. कारण घटादि कार्यें शरीरानें युक्त असलेल्या कुलालाकडून केलीं जातात, असें आपण पाहतों; व

तो सशरीर आहे, एवढें सिद्ध झालें म्हणजे आम्हांप्रमाणेंच तो क्लेशयुक्त, असर्वज्ञ, व परिमितशक्तियुक्त आहे, असें होईल !

सिद्धान्ती–( शैव )–ही व्यर्थ कुशंका आहे. कारण सशरीर असल्यावाचून क्रिया करवितां येत नाहीं, असा कांहीं अबाधित नियम नाहीं. कारण आत्मा अशरीर आहे. तथापि तो आपल्या शरीराकडून क्रिया करवितो. म्हणजे तो या शरीरकृत चेष्टेचा हेतुकर्ता ( प्रयोजक ) होऊं शकतो. शिवाय तुमच्या म्हणण्याप्रमाणें ईश्वर सशरीर आहे, असें जरी समजलें तरी भगवानाचे ठिकाणीं पूर्वोक्त दोषांची प्राप्तिच नाहीं. कारण त्याच्या ठिकाणीं मल, कर्म, इत्यादि पाशांचा असंभव असल्यामुळें त्याचें प्राकृत म्हणजे प्रकृतिजन्य जड शरीर नसतें, तर तें शक्तिरूप असतें. शक्तिरूप ईशानादि पांच मंत्रांच्या योगानें त्याच्या मस्तकादिकांची कल्पना होते. त्या ईश्वराचें ‘ ईशान० ’ हें मस्तक, ‘ तत्पुरुषाय० ’ हें मुख, ‘ अघोर० ’ हें हृदय, ‘ वामदेवाय० ’ हें गुह्य व ‘ सद्योजातं० ’ हे पाद आहेत. अर्थात् या मंत्ररूप मस्तकादि अवयवांनीं तो युक्त आहे, अशी प्रसिद्धि असल्यामुळें तो क्रमानें अनुग्रह, तिरोभाव, ग्रहणरूप, स्थितिरूप, व उद्भवरूप पांच क्रिया करतो. त्यानें आपल्या इच्छेनें निर्माण केलेलें शरीरच सृष्टीचें कारण आहे. त्यामुळें तें आमच्या शरीरासारखें नाहीं. म्हणूनच श्रीमन्मृगेंद्रांनीं ‘ मलाद्यसंभवाच्छाक्तं वपुर्नैतादृशं प्रभोः ’ म्हणजे प्रभूच्या शरीरामध्यें मलादिकांचा असंभव असल्यामुळें त्याचें शक्तिरूप शरीर आमच्या शरीरासारखें नाहीं, असें म्हटलें आहे. इतरत्रही—

तद्वपुः पञ्चभिर्मन्त्रैः पञ्चकृत्योपयोगिभिः ।
ईशतत्पुरुषाघोरवामाद्यैर्मस्तकादिमत् ॥

अर्थ–पांच कृत्यांच्या उपयोगी असलेल्या ईश-तत्पुरुष-अघोर-वाम-इत्यादि पांच मंत्रांच्या योगानें त्याचें शरीर मस्तकादिकांनीं युक्त आहे, असें म्हटलें आहे. ‘ अहो पण ‘ पंचवक्त्रस्त्रिपञ्चदृक्० ’ इत्यादि वच-

नानें आगमांत परमेश्वराच्या ठिकाणीं शरीरेंद्रियांचा मुख्यच योग आहे, असें सांगितलेलें आहे, ' म्हणून जर म्हणाल तर तें बरोबर आहे. कारण निराकार परमेश्वराची ध्यान-पूजा इत्यादि करतां येत नाहीं. त्यामुळें भक्तांवर अनुग्रह करण्यासाठीं तसा तसा आकार ग्रहण करणें योग्यच आहे. श्रीमत्पौष्करांत व अन्यत्रही क्रमानें असें म्हटलें आहे—

साधकस्य तु रक्षार्थं तस्य रूपमिदं स्मृतम् ।
आकारवांस्त्वं नियमादुपास्यो न वस्त्वनाकारमुपैति बुद्धिः ॥

अर्थ–१ साधकाच्या रक्षणासाठीं त्या परमेश्वराचें हें रूप सांगितलेलें आहे. २ आकारवान् असा तूं नियमानें उपासना करण्यास योग्य आहेस. कारण बुद्धि आकाररहित वस्तूला प्राप्त होत नाहीं. भोजराजानें पांच कृत्यें कोणतीं तें सांगितलें आहे.

पञ्चविधं तत्कृत्यं सृष्टिस्थितिसंहारतिरोभावः ।
तद्वदनुग्रहकरणं प्रोक्तं सततोदितस्यास्य ॥

अर्थ–सृष्टि, स्थिति, संहार, तिरोभाव व त्याचप्रमाणें भक्तांवर अनुग्रह करणें, असें पांच प्रकारचें त्या सतत उदय पावलेल्या ईश्वराचें कृत्य आहे. तो शिव हें कृत्यपंचक शुद्धमार्गामध्यें स्वतः करतो; व अहित मार्गांत अनन्तादिकांच्या द्वारा करतो. कारण श्रीमत्करणामध्यें–

शुद्धेऽध्वनि शिवः कर्ता प्रोक्तोऽनन्तोऽहिते प्रभोः ॥

अर्थ–शुद्ध मार्गामध्यें शिव कर्ता व अहितकर मार्गांत प्रभूचा भृत्य अनन्त कर्ता आहे. असो; याप्रमाणें शिव शब्दानें शिवत्वाचा ज्यांच्याशीं संबंध आहे अशा सर्वांचा संग्रह केला जातो. म्हणजे मंत्र, मंत्रेश्वर, महेश्वर, मुक्तात्मे व शिव, यांचा त्यांचे वाचक शब्द व दीक्षादि उपाय यांसह सर्वांचा शिव या शब्दाच्या अर्थांत संग्रह होतो, असें जाणावें.

असो; येथवर पतिशब्दाच्या अर्थाचें निरूपण केलें. आतां पशु या पदाच्या अर्थाचें निरूपण करतों. क्षेत्रज्ञादि शब्दांनीं बोलला जाणारा

जो जीवात्मा तोच पशु आहे. त्याचें प्रमाण अनणु आहे. म्हणजे तो वैष्णवांच्या समजुतीप्रमाणें अणुप्रमाण नाहीं. चार्वाकादि लोकायतिकांच्या मताप्रमाणें देहादिरूप नाहीं. कारण त्याला देहरूप मानल्यास स्वप्नांतील सुखदुःख व सुषुप्तींतील आनंद-अज्ञान इत्यादिकांचें स्मरण उपपन्न होत नाहीं. नैयायिकांच्या मताप्रमाणें प्रकाश्यही नाहीं. कारण त्याला प्रकाश्य मानल्यास अनवस्था दोष येतो. ( प्रकाश्य म्हणजे ज्ञानाचा विषय, ज्ञेय. ) म्हणूनच म्हटलें आहे—

आत्मा यदि भवेन्मेयस्तस्य माता भवेत्परः ।
पर आत्मा तदानीं स्यात् स परो यदि दृश्यते ॥

अर्थ—आत्मा जर मेय म्हणजे प्रमाणाचा विषय असेल तर त्याचा प्रमाता त्याहून निराळाच असणें युक्त आहे. त्यामुळें तसें मानल्यास आत्मा त्याहून निराळा ठरेल; व तोही जर दृश्य असेल तर त्याचा प्रमाता दुसरा मानावा लागेल. आणि याप्रमाणें अनवस्था दुर्वार होईल. तसाच तो जैनांच्या म्हणण्याप्रमाणें अव्यापकही नाहीं. म्हणजे ते जसा त्याला देहपरिच्छिन्न मानतात तसा तो नाहीं. कारण तसें समजल्यास तो अनित्य ठरतो. तसाच तो बौद्धांप्रमाणें क्षणिकही नाहीं. कारण तो देशानें जसा परिच्छिन्न होत नाहीं तसा कालानेंही परिच्छिन्न होत नाहीं. त्याविषयीं विद्वान् शैवांनीं असें म्हटलें आहे.—

अनवच्छिन्नसद्भावं वस्तु यद्देशकालतः ।
तन्नित्यं विभु चेच्छन्तीत्यात्मनो विभुनित्यता ॥

अर्थ—जी वस्तु देशतः व कालतः अवच्छिन्न ( मर्यादित ) न होणारी व सद्रूप असते ती नित्य व विभु आहे, असें विद्वान् समजतात. त्यामुळें तो जैनांच्या म्हणण्याप्रमाणें अव्यापक नाहीं. व बौद्धांप्रमाणें क्षणिक नाहीं. त्याचप्रमाणें अद्वैतवाद्यांच्या म्हणण्याप्रमाणें तो एक नाहीं. कारण प्रत्येक जीवाला त्याचा त्यालाच भोग मिळतो. एकाचा भोग दुसऱ्याच्या प्रतीतीला येत नाहीं. त्यामुळें प्रत्येक शरीरांत निरनिराळा

आत्मा असणें युक्त आहे. अर्थात् प्राण्यांचा स्वतंत्र भोगच पुरुषाच्या अनेकत्वाची कल्पना करवितो. तसाच आत्मा सांख्यांच्या म्हणण्याप्रमाणें अकर्ताही नाहीं. कारण त्याच्या सर्व पाशांचा निरास झाला असतां पुरुष शिव होतो, असें म्हटलें आहे. शिवाचें स्वरूप नित्य निरतिशय ज्ञान-क्रियारूप चैतन्य हेंच आहे. म्हणून श्रीमन्मृगेंद्रांनीं ‘ पाशान्ते शिवताश्रुतेः ’ म्हणजे पशूचे पाश नाश पावले असतां शिवता प्राप्त होते, असें आगमांत सांगितलें आहे, असें म्हटलें आहे. तसेंच--

चैतन्यं दृक्क्रिया रूपं तदस्यात्मनि सर्वदा ।
सर्वतश्च यतो मुक्तौ श्रूयते सर्वतोमुखम् ॥

अर्थ—चैतन्य ज्ञान-क्रियारूप आहे. तें चैतन्य या पशूंच्या आत्म्यामध्यें सर्वदा व सर्व बाजूंनीं असतें. कारण मुक्तीमध्यें तें सर्वतोमुख असतें असें आगमांत सांगितलें आहे. असें पूर्वोक्त मृगेंद्रांनींच म्हटलें आहे. तत्त्वप्रकाशांतही—

मुक्तात्मानोऽपि शिवाः किंचैते तत्प्रसादतो मुक्ताः ।
सोऽनादिमुक्त एको विज्ञेयः पञ्चमन्त्रतनुः ॥

अर्थ—मुक्तात्मेही शिवच होतात. पण ते त्याच्या प्रसादानें मुक्त होतात. तो अनादि मुक्त, एक, विज्ञेय ( जाणण्यास योग्य ) व पंच मंत्र हेंच ज्याचें शरीर आहे, असा आहे.

असो; पशु विज्ञानाकल, प्रलयाकल, व सकल असा तीन प्रकारचा आहे. विज्ञान, योग, अथवा संन्यास यांच्या योगानें किंवा भोगानें कर्माचा क्षय झाला असतां कर्मक्षयार्थ असलेले जे कलादि भोगबन्ध त्यांचा अभाव झाल्यामुळें जो केवल मलयुक्त असलेला पशु तो विज्ञानाकल; प्रलयाच्या योगानें कलादिकांचा उपसंहार झाला असतां मल व कर्म यांनीं युक्त असलेला जो पशु तो प्रलयाकल; आणि जो मल, माया व कर्म या तीन बंधांनीं युक्त असलेला पशु तो सकल होय. या तीन प्रकारच्या पशूंतील ज्यांच्या मलाचा परिपाक झाला आहे अशा

पहिल्या प्रकारच्या अधिकारी पुरुषश्रेष्ठांवर अनुग्रह करून शिव त्यांना अनन्तादि आठ विद्येश्वरांच्या पदास पोंचवितो. बहुदैवत या नांवाच्या ग्रंथांत त्या विद्येश्वराष्टकाचा असा निर्देश केला आहे.—

अनन्तश्चैव सूक्ष्मश्च तथैव च शिवोत्तमः ।
एकनेत्रस्तथैवैकरुद्रश्चापि त्रिमूर्तिकः ॥
श्रीकण्ठश्च शिखण्डीच प्रोक्ता विश्वेश्वरा इमे ॥

अर्थ—अनन्त, सूक्ष्म, शिवोत्तम, एकनेत्र, एकरुद्र, त्रिमूर्तिक, श्रीकण्ठ, व शिखण्डी हे विश्वेश्वर होत. तत्त्वप्रकाशांत—

पशवस्त्रिविधाः प्रोक्ता विज्ञानप्रलयकलौच सकलः ।
मलयुक्तस्तत्राद्यो मलकर्मयुतो द्वितीयः स्यात् ॥ १ ॥
मलमायाकर्मयुतः सकलस्तेपु द्विधा भवेदाद्यः ।
आद्यःसमाप्तकलुषोऽसमाप्तकलुषो द्वितीयः स्यात् ॥ २ ॥
आद्याननुगृह्य शिवो विद्येशत्वे नियोजयत्यष्टौ ।
मन्त्रांश्च करोत्यपरांस्ते चोक्ताः कोटयः सप्त ॥ ३ ॥

अर्थ—पशु तीन प्रकारचे सांगितलेले आहेत; विज्ञानकल, प्रलयकल व सकल त्यांतील पहिला मलयुक्त, दुसरा मल-कर्मयुक्त १ व तिसरा सकल मल-माया-कर्मयुक्त. त्यांतील पहिला दोन प्रकारचा आहे. एक समाप्त कलुष व दुसरा असमाप्त कलुष. २ त्यांतील समाप्त कलुष ( म्हणजे ज्यांचा मल समाप्त झाला आहे ) पशूवर शिव अनुग्रह करतो व त्याला आठ प्रकारच्या विद्येशत्वाच्या ठिकाणीं योजतो. दुसरे मंत्रही करतो. ते सात कोटि आहेत, म्हणून सांगितलें आहे. ३ सोमशंभूनेंही असेंच सांगितलें आहे—

विज्ञानकलनामैको द्वितीयः प्रलयाकलः ।
तृतीयः सकलः शास्त्रेऽनुग्राह्यस्त्रिविधोमतः ॥ १ ॥
तत्राद्यो मलमात्रेण युक्तोऽन्यो मलकर्मभिः
कलादिभूमिपर्यन्ततत्त्वैस्तु सकलो युतः ॥ २ ॥

अर्थ—विज्ञानकल नांवाचा एक, प्रलयाकल हा दुसरा, व सकल हा तिसरा, असा शास्त्रांत अनुग्राह्य तीन प्रकारचा सांगितला आहे. त्यांतील पहिला नुस्ता मलानें युक्त, दुसरा मल व कर्म यांनीं आणि तिसरा सकल कलादिभूमिपर्यन्ततत्त्वांनीं युक्त आहे. असो; प्रलयाकलही दोन प्रकारचा आहे. ज्याचे दोन्ही पाश पक्व झाले आहेत असा एक व ज्याचे ते पक्व झाले नाहींत असा दुसरा. त्यांतील पहिला मोक्षाला प्राप्त होतो. दुसरा पुर्यष्टकानें युक्त होऊन कर्मवशात् नानाविध जन्मांना पात्र होतो. तेंही तत्त्वप्रकाशांत सांगितलें आहे.—

प्रलयाकलेषु येषामपक्वमलकर्मणी व्रजन्त्येते ।
पुर्यष्टकदेहयुक्ता योनिषु निखिलासु कर्मवशात् ॥

अर्थ—प्रलयाकलांतील ज्यांचा मल व कर्म अपक्व असतात ते पुर्यष्टक देहानें युक्त होऊन कर्मवशात् सर्व योनींत जातात. पुर्यष्टक म्हणजे काय त्याचेंही व्याख्यान ‘ स्यात्पुर्यष्टकमन्तःकरणं धीः कर्म करणानि ’ म्हणून अन्तःकरणें, बुद्धि, कर्म व इंद्रियें यांचा समूह हेंच पुर्यष्टक आहे, असें वचन आहे. अघोर शिवाचार्यांनीं वरील वाक्याचेंच असें विवरण केलें आहे. पुर्यष्टक म्हणजे प्रत्येक पुरुषाला नियत असलेला व सृष्टीच्या आरंभापासून कल्पान्तापर्यंत किंवा मोक्षापर्यंत राहणारा पृथिवीपासून कलापर्यंत तीस तत्त्वांचा सूक्ष्म देह. तत्त्वसंग्रहांत तसेंच सांगितलें आहे.

वसुधाद्यस्तत्त्वगणः प्रतिपुन्नियतः कलान्तोऽयम् ।
पर्यटति कर्मवशाद्भुवनजदेहेष्वयं च सर्वेषु ॥

अर्थ—प्रत्येक पुरुषाला नियत असलेला जो हा पृथ्वीपासून कलांपर्यंत तत्त्वगण आहे तो कर्मवशात् भुवनांतील सर्व देहांमध्यें पर्यटन करतो. अर्थात् यावरून हा अर्थ निष्पन्न झाला——मन, बुद्धि, अहंकार व चित्त या चार तत्वांचा वाचक अशा अन्तःकरण शब्दानें कला-काल,-नियति, विद्या, राग, प्रकृति व गुण या पुरुषाच्या भोगाक्रियें,

तील सात अन्तरंग तत्त्वांचें ज्ञान होतें. धीकर्मशब्दानें ज्ञेय पंचभूतें व त्यांचीं करणें तन्मात्रें विवक्षित आहेत. करणशब्दानें ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें या दहा इंद्रियांचें ग्रहण करावें. आतां श्रीमत्कमलोत्तरांत 'शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, बुद्धि, मन व अहंकार हें पुर्यष्टक आहे,' असें म्हटलें आहे, हें खरें. परंतु श्रीरामकाण्डानें त्या सूत्राचें शक्तत्व-परतेनें म्हणजे ज्याला शक्तत्व आहे, त्यालाच ज्ञानक्रियासामर्थ्य आहे, अशा रीतीनें व्याख्यान केलें आहे. तरी पण त्याला पुर्यष्टकत्व कसें आहे, म्हणून जर विचाराल तर सांगतों—भूतपंचक, तन्मात्रपंचक, ज्ञानेंद्रियपंचक, व कर्मेंद्रियपंचक व अन्तःकरण चतुष्टय हे पांच वर्ग, त्यांचें कारण प्रधान, कला, काळ, नियति, विद्या व राग यांचा वर्ग यांपासून त्याचा आरंभ झालेला आहे. म्हणून तें पुर्यष्टक होय.

असो; त्या पुर्यष्टकयुक्त पशूंतील जे कांहीं विशिष्ट पुण्यसंपन्न असतात त्यांच्यावर अनुग्रह करून अनन्त महेश्वर त्यांना भुवनपतित्व देतो. त्याविषयीं 'कांश्चिदनुगृह्य वितरति भुवनपतित्वं महेश्वरस्तेषाम्' म्हणजे कांहीं जणांवर अनुग्रह करून महेश्वर त्यांना भुवनपतित्व देतो, असें एके ठिकाणीं म्हटलें आहे.

तिसरा सकल पशुही दोन प्रकारचा असतो. एक पक्वकलुष व दुसरा अपक्वकलुष. त्यांतील पहिल्याप्रकारच्या पक्वकलुष पशूंच्या पापाचा जसा परिपाक झाला असेल त्याच्या अनुरोधानें तदनुरूप शक्तीचा पात (उपसंहार) करून महेश्वर त्यांना माण्डल्यादि अष्टादशोत्तरशत (११८) मन्त्रेश्वरपद देतो. याविषयीं असें म्हटलें आहे.—

शेषा भवन्ति सकलाः कलादियोगादहर्मुखे काले ।
शतमष्टादश तेषां कुरुते स्वयमेव मन्त्रेशान् ॥ १ ॥
तत्राष्टौ मण्डलिनः क्रोधाद्यास्तत्समाश्च वीरेशः ।
श्रीकण्ठः शतरुद्राः शतमित्यष्टादशाभ्यधिकम् ॥ २ ॥

अर्थ—कलादिकांच्या योगानें अहर्मुखसमयीं सकल पशु शेष होतात.

त्यांतील एकशें अठरांना महेश्वर स्वतः मन्त्रेश्वर करतो. त्यांतील आठ मण्डलाचे गण होतात. दुसरे आठ क्रोधादिक होतात. एकजण वीरेश व दुसरा एक श्रीकण्ठ होतो. आणि बाकीचे शंभर शत रुद्र होतात. एकूण एकशें अठरा मन्त्रेश होतात. १; २. नंतर परमेश्वर आचार्यांच्या मूर्तीमध्यें स्थित होऊन त्यांच्या अधिक परिपाकाचा निरोध करणें, शक्तीचा उपसंहार करणें व दीक्षा देणें यांच्या योगानें मोक्षप्रद होतो. कारण तेंही असें सांगितलें आहे.–

परिपक्कमलानेतानुत्सादनहेतुशक्तिपातेन ।
योजयति परे तत्त्वे स दीक्षयाऽऽचार्यमूर्तिस्थः ॥ १ ॥

अर्थ - ज्यांचे कामक्रोधादि मल परिपक्क झाले आहेत त्यांच्या ठिकाणच्या नाशाला कारण होणाऱ्या शक्तीच्या पातानें ( म्हणजे अशा त्या शक्तीचा उपसंहार करून ) व दीक्षेच्या योगानें आचार्यांच्या मूर्तीमध्यें स्थित असलेला तो महेश्वर पर तत्त्वामध्यें त्याला योजितो. १. श्रीमन्मृगेन्द्रांतही–' पूर्वं व्यत्यासितस्याणोः पाशजालमपोहति ' म्हणजे पूर्वी ज्याच्या स्वभावांत फरक पाडला आहे अशा अणुपशूचें पाशजाल तो तोडतो, असें म्हटलें आहे व त्याचें सविस्तर व्याख्यानही नारायणकण्ठानें केलें आहे. तें सर्व मूळ ग्रंथांतच पहावें.

ज्या सकळ पशूंचें कलुष ( मल ) परिपक्क झालेले नसतात त्या बद्ध अणूंना परमेश्वर त्यांच्या कर्माप्रमाणें भोग भोगण्यास योग्य करतो. तेंही सांगितलें आहे—

बद्धाञ्शेषानपरान्विनियुङ्क्ते भोगभुक्तये पुंसः ।
तत्कर्मणामनुगमादित्येवं कीर्तिताः पशवः ॥ १ ॥

अर्थ--बाकीच्या दुसऱ्या सर्व बद्ध पशूंना त्या त्या पुरुषाच्या कर्माच्या अनुरोधानें परमेश्वर भोग भोगावयास लावतो. अशा तऱ्हेनें पशूंचें म्हणजे पशु या दुसऱ्या पदार्थाचें वर्णन केलें.

## पाशांचें वर्णन.

आतां पाश या नांवाच्या तिसऱ्या पदार्थाचें वर्णन करतों. पाश चार प्रकारचा आहे. मल, कर्म, माया व रोधशक्ति हे ते भेद होत. अहो-पण

**शैवागमेषु मुख्यं पतिपशुपाशा इति क्रमात्त्रितयम् ।**

**तत्र पतिः शिव उक्तः पशवो ह्यणवोऽर्थपञ्चकं पाशाः ॥१॥**

अर्थ--शैवागमामध्यें, पति, पशु व पाश असें क्रमानें त्रिविध मुख्य प्रतिपाद्य आहे. त्यांत पति शिव आहे. पशु अणू आहेत. व अर्थ पंचक हे पाश आहेत १. या पद्यांत पाश पांच प्रकारचा आहे, हें सांगितलें आहे. मग तुम्ही त्याला चार प्रकारचा कसा म्हणतां ? ' असें कोणी म्हणेल तर सांगतों--शिवतत्त्व या नांवाच्या मायारूप बिंदूला शिवपदप्राप्तिरूप परम मुक्तीच्या अपेक्षेनें पाशत्व जरी असलें म्हणजे शिवपदप्राप्ति या मुख्य मुक्तीच्या अपेक्षेनेंच शिवतत्त्वाला पाश असें जरी म्हणतां आलें तरी शिवतत्त्वाच्या योगानें विद्येश्वरादि पदांची प्राप्ति होते. यास्तव त्यालाही अपरमोक्ष म्हणतात. म्हणून आम्ही त्याचा येथें पाश या रूपानें उल्लेख केलेला नाहीं. तत्त्वप्रकाशा-मध्येंही पाश चतुर्विध आहेत असें म्हटलें आहे. श्रीमन्मृगेंद्रांतही—

**प्रावृतीशौ बलं कर्म मायाकार्यं चतुर्विधम् ।**

**पाशजालं समासेन धर्मनाम्नैव कीर्तिताः ॥ १ ॥**

अर्थ—आत्म्याचें ज्ञान व क्रिया यांना विशेषप्रकारें जी आच्छादित करते ती प्रावृति स्वभावतःच अशुचि आहे. म्हणूनच तिला मल म्हणतात. त्या मलावर स्वतंत्रपणें जो अधिकार चालवितो तो ईश होय. कारण मलाविषयीं असें म्हटलें आहे—

**एको ह्यनेकशक्तिर्दृक्क्रिययोश्छादको मलः पुंसः ।**

**तुषतण्डुलवज्ज्ञेयस्ताम्राश्रितकालिकावद्वा ॥ १ ॥**

अर्थ—मल एक, अनेक शक्तींनीं युक्त व पुरुषाचें ज्ञान व क्रिया

यांना आच्छादित करणारा आहे. तो तांदळाला झांकणाऱ्या तुषाप्रमाणें किंवा तांब्याला झांकणाऱ्या कलंकाप्रमाणें आहे, असें जाणावें १. असो; बल म्हणजे रोधशक्ति; ती पाशाच्या आश्रयानें पुरुषाला आच्छादित करते. म्हणून तिला गौणवृत्तीनें 'पाश' असें म्हणतात. त्यासाठींच—

तासामहं वरा शक्तिः सर्वानुग्राहिका शिवा ।
धर्मानुवर्तनादेव पाश इत्युपचर्यते ॥ १ ॥

अर्थ—शिवाच्या अनेक शक्तींतील मी श्रेष्ठ शक्ति आहें. मी सर्वांवर अनुग्रह करणारी व मंगलरूप आहें. पण आच्छादकत्व हा पाशाचा धर्म माझ्या ठिकाणींही अनुवृत्त होत असल्यामुळें मला उपचारानें पाश म्हणतात.

फलाची इच्छा करणाऱ्या पुरुषांकडून जें केलें जातें तें कर्म, धर्म व अधर्म असें दोन प्रकारचें आहे. तें बीजांकुराप्रमाणें प्रवाहरूपानें अनादि आहे. कारण श्रीमत्किरणांत तसें म्हटलें आहे.

यथाऽनादिर्मलस्तस्य कर्माल्पकमनादिकम् ।
यद्यनादिरसंसिद्धं वैचित्र्यं केन हेतुना ॥

अर्थ--रागादि मल अनादि आहे. त्यामुळें त्याचें अल्पकर्मही अनादिच असणार हें उघड आहे. कारण तें जर अनादिसिद्ध नसेल तर त्याच्यामध्यें वैचित्र्य कोणत्या कारणानें दिसेल. असो; प्रलयकाळीं हें सर्व जग जिच्यामध्यें शक्तिरूपानें असतें व सृष्टिसमयीं पुनः व्यक्त होतें ती माया असें मायापाशाचें वर्णन केलें आहे. श्रीमत्सौरभेय ग्रंथांत—

शक्तिरूपेण कार्याणि तल्लीनानि महाक्षये ।
विकृतौ व्यक्तिमायाति सा कार्येण कलादिना ॥

अर्थ--महाक्षयामध्यें कार्यें शक्तिरूपानें मायेंत लीन होतात व ती माया विकृति समयीं कलादि कार्यांच्या रूपानें व्यक्त होते. असो; या

दर्शनाविषयीं पुष्कळ बोलतां येण्यासारखें आहे. पण ग्रंथविस्तर होईल; या भीतीनें तें येथेंच संपवितों.

येणें प्रमाणें या दर्शनांत पति, पशु, व पाश असे तीन पदार्थ वर्णिले. ज्ञानरत्नावल्यादि ग्रंथांत दुसरा प्रकारही सांगितला आहे. पण तो त्यांतूनच समजून घ्यावा. येथें शैवदर्शन समाप्त झालें.

## ३-प्रत्यभिज्ञादर्शनसार.

शैवमतांत अपेक्षारहित जड पदार्थांना कारण मानतात. पण तसें मानणें निर्दोष नाहीं, असें समजून त्यांच्या मतानें संतुष्ट न होणारे कित्येक माहेश्वर दुसरें मत कल्पितात. ते परमेश्वराच्या विशेष इच्छेनेंच जगाची उत्पत्ति होते, असें समजतात. ते केवळ प्रत्यभिज्ञा हेंच पर व अपर पुरुषाचें साधन आहे, असें समजून प्रत्यभिज्ञा शास्त्राचाच अभ्यास करितात. कारण तें प्रत्यभिज्ञा शास्त्र चर्या, प्राणायाम इत्यादि बाह्य व आभ्यंतर उपायानुष्ठानामुळें होणारे जे क्लेश त्यांनीं रहित आहे. म्हणूनच तें सर्वांना सुलभ आहे. परमेश्वर निरपेक्ष स्वतंत्र आहे. कारण आपलें कार्य करीत असतांना त्याला दुसऱ्या कोणाच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग येत नाहीं. स्वतःचें संवेदन ( ज्ञान, जाणीव ) हीच उपपत्ति व आगम यांवरून त्याचें प्रत्यगात्म्याशीं तादात्म्य आहे, ही गोष्ट सिद्ध होते. त्यामुळें प्रत्यभिज्ञा आत्मरूप आरशांत प्रतिबिंबित होऊन राहिलेल्या त्याला प्रतिबिंबाप्रमाणेंच प्रकाशित करते. असो; विद्वानांनीं त्या प्रत्यभिज्ञाशास्त्राची इयत्ता अशी सांगितली आहे—

सूत्रं वृत्तिर्विवृतिर्लघ्वी बृहतीत्युभे विमर्शिन्यौ ।
प्रकरणविवरणपञ्चकमिति शास्त्रं प्रत्यभिज्ञायाः ॥ १ ॥

अर्थ—सूत्र, त्याची वृत्ति, त्या वृत्तीचा विशेष विचार करणाऱ्या लहान व मोठी अशा दोन विवृती, प्रकरण व विवरण. अशा पांच अंगांनीं प्रत्यभिज्ञाशास्त्र युक्त आहे. त्याचें पहिलें सूत्र हें—

कथंचिदासाद्य महेश्वरः स्याद्दास्यं जनस्याप्युपकारमिच्छन् ।
समस्तसंपत्समवाप्तिहेतुं तत्प्रत्यभिज्ञामुपपादयामि ॥ १ ॥

अर्थ--महेश्वर लोकाला दास्यास कसा तरी प्राप्त करवून उपकाराची इच्छा करीत असतो. यास्तव सर्व प्रकारच्या संपत्ती प्राप्त होण्यास कारण असलेल्या त्याच्या प्रत्यभिज्ञेचें मी उपपादन करतों. या सूत्राचें सविस्तर व्याख्यान असें–' कथंचित्–' परमेश्वराहून भिन्न नसलेलें जें गुरुचरणकमलद्वय त्याच्या उत्तम प्रकारच्या आराधनेनें; ' आसाद्य–' आ–समंतात् परिपूर्णतेनें; व सादयित्वा–निष्प्रतिबंध स्वात्मभोग्यतेस प्राप्त करवून; म्हणजे परमेश्वरस्वरूप गुरुचरणकमलाच्या ईश्वरदत्त आराधनेनें स्वतःच्या निष्प्रतिबंध भोग्यतेस प्राप्त करवून; असा याचा भावार्थ. या वचनानें तो विदितवेद्य झालेला असल्यामुळें दुसऱ्यासाठीं शास्त्र करण्याचा त्याचा अधिकार दाखविला. कारण तो उपासक जर विदितवेद्य ( म्हणजे ज्ञातज्ञेय, ज्याला सर्व ज्ञेय कळलें आहे असा ) असेल तरच त्याच्या हातून प्रतारणा घडणार नाहीं. नाहीं तर तो आपल्या शास्त्राच्या योगानें अज्ञांशीं प्रतारणाच करील. ' महेश्वरः--' ब्रह्मा, विष्णु इत्यादि मायेंतून तरून पार गेलेलेही देव जगद्रूप महामायेंत अधिकृत आहेत. म्हणजे जगाची उत्पत्ति, स्थिति, लय इत्यादिं करणें हें त्यांचें नियत कार्य आहे. परंतु ते तसले अधिकारी देवही ज्याच्या ऐश्वर्याच्या लेशानें ईश्वर झाले आहेत तो भगवान् तर अमर्याद प्रकाश, आनन्द, व स्वातंत्र्य यांनीं परमोत्तम महेश्वर झाला आहे. त्याचें ' दास्य--' स्वामी ज्याला सर्व अभिलषित देतो तो दास. म्हणजे परमेश्वराचें स्वरूप व स्वातंत्र्य यांस पात्र असलेला. ' जन--' या शब्दानें या शास्त्राच्या अधिकारी पुरुषाविषयीं कांहीं नियम नाहीं, असें सुचविलें आहे. ज्याला ज्याला हें स्वरूप सांगितलें जातें त्याला त्याला महाफळ प्राप्त होतें. कारण प्रधान फळालाच परमार्थ फळ म्हणतात. कारण भगवत्सोमानन्दनाथपादांनीं शिवदृष्टींत तसें लिहिलें आहे.—

एकवारं प्रमाणेन शास्त्राद्वा गुरुवाक्यतः ।
ज्ञाते शिवत्वे सर्वस्थे प्रतिपत्त्या दृढात्मना ॥ १ ॥
करणेन नास्ति कृत्यं क्वापि भावनया सकृत् ।
ज्ञाते सुवर्णे करणं भावनां वा परित्यजेत् ॥ २ ॥

अर्थ–एकदां कोणत्याही प्रमाणानें, शास्त्रावरून किंवा गुरुवाक्यानें झालेल्या दृढरूप ज्ञानानें सर्वस्थ शिवत्व ज्ञात झालें असतां साधनाचें कांहीं कार्यच उरत नाहीं. त्याचप्रमाणें भावनेचेंही कांहीं प्रयोजन रहात नाहीं. कारण एकदा सुवर्णाचें ज्ञान झालें म्हणजे त्याच्या ज्ञानाचें साधन किंवा भावना यांचा आपण नेहमी परित्यागच करीत असतों.

'जनस्यापि' येथील आपलें त्याच्याशीं ऐक्य आहे, असें व्यक्त करणाऱ्या अपिशब्दानें स्वात्म्यामध्यें परार्थसंपत्तीवाचून दुसऱ्या प्रयोजनाला अवकाशच रहात नाहीं, असें सुचविलें आहे व परार्थ हें सुद्धां प्रयोजन आहेच. कारण परार्थामध्येंही प्रयोजनाचें लक्षण दिसतें. शिवाय स्वार्थच प्रयोजन आहे व परार्थ प्रयोजन नाहीं, असा कांहीं देवांनीं ठराव केलेला नाहीं. म्हणूनच अक्षपादानें 'ज्या विषयाला उद्देशून पुरुष प्रवृत्त होतो तें प्रयोजन होय,' असें म्हटलें आहे. 'उपकारं' या पदांतील उपशब्द सामीप्य या अर्थी आहे. त्यामुळें लोकाला परमेश्वराच्या समीप करणें, हेंच फळ आहे. म्हणूनच 'समस्तसंपत्समवाप्तिहेतुं–' असें प्रत्यभिज्ञेला विशेषण दिलें आहे. कारण परमेश्वरतेचा लाभ झाला असतां सर्व संपत्तींचा लाभ होतो. कारण त्या संपत्ती परमेश्वराच्या निःश्वासासारख्या आहेत. त्यामुळें परमेश्वरतेचा लाभ झाल्यावर आणखी मिळवायचें राहिलें काय ? कांहीं नाहीं. त्यासाठींच उत्पलाचार्यांनीं असें म्हटलें आहे—

भक्तिलक्ष्मीसमृद्धानां किमन्यदुपयाचितम् ।
एतया वा दरिद्राणां किमन्यदुपयाचितम् ॥ १ ॥

अर्थ–भक्तिरूप संपत्तीनें समृद्ध असलेल्या लोकांना दुसरें मागाव-

याचें काय उरणार ? कांहीं नाहीं. पण त्या भक्तिधनानेंच हीन असलेल्या लोकांना याचना करावयास नको, असें काय असणार ? कांहीं नाहीं. कारण त्यांना प्रत्येक हवेंसेंच असणार. नकोसें कांहींच नाहीं. असो; ‘ समस्त संपत्तींच्या प्राप्तीचा हेतु ’ असा षष्ठी समास केल्यास हा असा अर्थ होतो. पण समस्त संपत्तींची प्राप्ति म्हणजे बाह्य व आभ्यन्तर नित्य सुखादिकांची सिद्धि हाच ज्या प्रत्यभिज्ञेचा हेतु आहे, ती प्रत्यभिज्ञा समस्तसंपत्समवाप्तिहेतु होय; असा बहुव्रीहि समास केल्यास त्या महेश्वराची सुखादिकांच्या प्राप्तीमुळें होणारी जी प्रत्यभिज्ञा—म्हणजे त्याची प्रतिमा समोर येतांच होणारी ओळख—तिचें उपपादान करतों, असा अर्थ निष्पन्न होतो. व्यवहारांतही तोच हा चैत्र या नांवाचा मनुष्य, असें समोर आलेल्या मनुष्याविषयीं ज्ञान होणें हिलाच प्रत्यभिज्ञा--ओळख म्हणतात. त्याचप्रमाणें प्रसिद्ध, पुराणसिद्ध, व आगम, अनुमान इत्यादिकांवरून ज्याची परिपूर्णशक्ति ज्ञात झाली आहे, असा परमेश्वर अन्तःकरणांत आरूढ झाला असतां तोच हा जगत्कर्ता, असें ज्ञान होतें. तोच परमेश्वर मी आहें, असें भान होतें. अशा त्या प्रत्यभिज्ञेचें मी उपपादन करतों, म्हणजे ती कशी संभवते तें सांगतों. हा वरील ‘ कथंचिदासाद्य० ’ या सूत्राचा सविस्तर अर्थ आहे.

पण यावर कोणी अशी शंका घेतील कीं जर ईश्वरस्वभावच आत्मरूपानें प्रकाश पावतो तर मग या प्रत्यभिज्ञादर्शनाच्या प्रयासाचा काय उपयोग ? या शंकेचें समाधान असें--आत्मा स्वप्रकाश असल्यामुळें सतत प्रकाशमान होतो, हें खरें; पण त्याच्या मायेमुळें त्याचा प्रकाश पूर्णपणें होत नाहीं. तर अंशतः होतो. यास्तव त्याचें पूर्णत्वानें ज्ञान व्हावें, म्हणून ज्ञान-क्रियारूप शक्तीला प्रकट करून त्याची ओळख करून द्यावी लागते. याविषयीं अनुमान असें करावें.—हा आत्मा परमेश्वरच असणें उचित आहे. कारण तो ज्ञान व क्रिया या दोन

शक्तींनीं युक्त आहे. कारण जो जेवढ्याचा ज्ञाता व कर्ता असतो तेंवढयाचा ईश्वरही असतो. जसा लौकिक ईश्वर--स्वामी किंवा राजा. आत्मा सर्व विश्वाला जाणणारा आहे; व सर्व विश्वाचा कर्ताही आहे. म्हणून तो त्याचा ईश्वरही आहे. प्रत्यभिज्ञावादी माहेश्वर नैयायिकांच्या अनुमानाचे पांच अवयव मानतात व मायावादही स्वीकारतात. त्यामुळें त्यांना वरच्या सारखें अनुमान करितां येतें. असो; याविषयीं उदयकरसूनूनें म्हटलें आहे—

कर्तरि ज्ञातरि स्वात्मन्यादिसिद्धे महेश्वरे ।
अजडात्मा निषेधं वा सिद्धिं वा विदधीत कः ॥ १ ॥
किंतु मोहवशादस्मिन्दृष्टेऽप्यनुपलक्षिते ।
शक्त्याविष्करणेनेयं प्रत्यभिज्ञोपदर्श्यते ॥ २ ॥

अर्थ--कर्ता, ज्ञाता, स्वात्मा व आदिसिद्ध अशा महेश्वराविषयीं कोणता सुज्ञ मनुष्य निषेध किंवा सिद्धि करणार आहे ? ( कारण कोणत्याही असिद्ध वस्तूचाच निषेध किंवा सिद्धि संभवते. ) १. परंतु तो जरी सामान्यतः दिसला तरी मोहवशात् विशेषतः अनुभवाला येत नाहीं. यास्तव त्याच्या पूर्वोक्त दोन शक्तींच्या आविष्करणानें ही प्रत्यभिज्ञा दाखविली जाते. २ त्याचप्रमाणें—

सर्वेषामिह भूतानां प्रतिष्ठा जीवदाश्रयः ।
ज्ञानं क्रिया च भूतानां जीवतां जीवनं मतम् ॥ १ ॥
तत्र ज्ञानं स्वतःसिद्धं क्रिया काश्याश्रिता सती ।
परैरप्युपलक्ष्येत तयाऽन्यज्ज्ञानमुच्यते ॥ २ ॥
या चैषां प्रतिभा तत्तत्पदार्थक्रमरूपिता ।
अक्रमानन्दचिद्रूपः प्रमाता स महेश्वरः ॥ ३ ॥

अर्थ—या सृष्टींतील सर्व भूतांची प्रतिष्ठा जीवनाचा आश्रय करून राहिलेली आहे. जिवंत भूतांचें ज्ञान व क्रिया हेंच जीवन मानलेलें आहे. त्यांतील ज्ञान स्वतःसिद्ध आहे व क्रिया प्रकाशाचा ( म्हणजे

ज्ञानाचा ) आश्रय करून राहते. ती ज्ञानावाचून विद्यमान होत नाहीं. क्रिया दुसऱ्या जीवांच्या ज्ञानाचा विषय होते. म्हणजे एका जीवाच्या ठिकाणची क्रिया दुसऱ्या जीवांनाही दिसते. पण ज्ञान तसें दिसत नाहीं. तें प्रत्यक्ष अनुभवास येत नाहीं. तर क्रियेवरून त्याचें अनुमान होतें. ज्ञान क्रियेहून अन्य नाहीं. परंतु त्या त्या पदार्थांना क्रमानें विषय करणारी जी जीवांची प्रतिभा तोच प्रमाता महेश्वर असून तो क्रमावाचून सकृदानन्द व सकृच्चिद्रूप आहे. सोमानन्दनाथपादांनींही—

सदा शिवात्मना वेत्ति सदा वेत्ति मदात्मना ॥

म्हणजे अधिकारी आपणाला सदा शिवरूपानें जाणतो व सदा मद्रूपानें जाणतो, असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणें ज्ञानाधिकारपरिसमाप्तींतही—

तदैक्येन विना नास्ति संविदां लोकपद्धतिः ।
प्रकाशैक्यात्तदेकत्वं मातैकः स इति स्थितः ॥ १ ॥
स एवार्थमृशत्वेन नियतेन महेश्वरः ।
विमर्श एव देवस्य शुद्धे ज्ञानक्रिये यतः ॥ २ ॥

अर्थ—प्रकाशांशीं ऐक्य पावल्यावाचून निरनिराळ्या प्रकारचीं विषयज्ञानें संभवत नाहींत. तो प्रकाश एक असल्यामुळें महेश्वरही एक आहे व तोच एक प्रमाता म्हणजे जीव होऊन राहिला आहे. तोच विषयांचा नियत विमर्शक असल्यामुळें महेश्वर होय. कारण देवाच्या शुद्ध ज्ञान-क्रिया हाच विमर्श आहे. अर्थात् चिद्रूप प्रकाशाच्या माहात्म्यानें सर्व पदार्थांचें भान होतें. त्यामुळें प्रकाशच भान आहे. त्याचे ठिकाणीं देश, काल, आकार, संकोच, विकास इत्यादिकांचा अभाव असल्यामुळें तो प्रकाश एक आहे. त्या चैतन्यरूपालाच प्रमाता म्हणतात. म्हणूनच शिवसूत्रांत चैतन्यच आत्मा आहे, असें म्हटलें आहे. त्याचे चैतन्यरूपत्व, अमर्यादविमर्शत्व, अनन्योन्मुखत्व, आनन्दैकघनत्वं व माहेश्वर्य्य हे सर्व पर्याय शब्द आहेत. प्रकाशरूपता हेंच त्याचें ज्ञान व स्वतः जगन्निर्मातृत्व हीच क्रिया होय. क्रियाधिकारामध्यें असें सांगितलें आहे—

एष चानन्दशक्तित्वादेवमाभासयत्यमून् ।
भावानिच्छावशादेषां क्रिया निर्मातृताऽस्य सा ॥ १ ॥

अर्थ--आणि हा आनन्दशक्तीनें युक्त असल्यामुळें इच्छेच्या योगानें अशा रीतीनें या भावांना प्रकाशित करतो. त्या भावांना निर्माण करणें हीच त्याची क्रिया आहे. १. उपसंहारांतही--

इत्थं तथा घटापटाद्याकारजगदात्मना ।
तिष्ठासोरेवमिच्छैव हेतुकर्तृकृता क्रिया ॥ १ ॥
तस्मिन्सतीदमस्तीति कार्यकारणतापि या ।
साप्यपेक्षाविहीनानां जडानां नोपपद्यते ॥ २ ॥

अर्थ--ज्याअर्थी जडाला किंवा परतंत्र जीवांना जगत्कर्तृता नसते त्या अर्थी जगांतील घट-पटादि आकार व जन्म-स्थित्यादि विकार यांच्या रूपानें स्वतः होऊन राहण्याची इच्छा करणाऱ्या त्या स्वतंत्र भगवानाची इच्छाच हेतुकर्तृकृत क्रिया आहे १. कारण असलें तर कार्य असतें; अशा प्रकारची जी कार्यकारणता तीही ज्यांना परस्पर अपेक्षाच नसते त्या जडांना उपपन्न होत नाहीं. २. महेश्वर नुस्त्या इच्छेनेंच जगाला निर्माण करतो, याविषयीं दृष्टान्तही स्पष्टपणें सांगितला आहे--

योगिनामपि मृद्बीजे विनैवेच्छावशेन यत् ।
घटादि जायते तत्तत्स्थिरस्वार्थक्रियाकरम् ॥ १ ॥

अर्थ--मृत्तिका, बीज इत्यादि कारणांवाचून केवल योग्यांच्या इच्छे-नेंही जें जें घटादि कार्य उत्पन्न होतें तें तें सर्व आपापली स्थिर क्रिया करणारें असतें. म्हणजे घटादि कार्यांचें मृदादिकच जर परमार्थतः कारण असतें तर योग्यांच्या नुस्त्या इच्छेनेंच घटादि पदार्थांचा जन्म कसा झाला असता ? बरें, मृत्तिका, बीज, इत्यादिकांपासून होणारीं घट, अंकुर इत्यादि कार्यें निराळीं व योग्याच्या इच्छेनें होणारीं घटादि कार्यें निराळीं म्हणून म्हणावें तर तेंही युक्त नाहीं. कारण भिन्न सामग्री-मुळें भिन्न कार्यें होतात, हा नियम सर्व लोकप्रसिद्ध आहे. आतां

दुसरे जे कित्येक—उपादानावाचून घटादिकांची उत्पत्ति होत नाहीं, असा नियम आहे. यास्तव योगीसुद्धां आपल्या इच्छेनें परमाणूंमध्यें क्रिया उत्पन्न करून त्यांचें कार्य करवितो--असें म्हणतात तेंही बरोबर नाहीं. कारण व्यवहारांत दिसणारा कार्यकारणभाव अव्यावहारिक योगि-कार्यांतही बदलूं शकत नाहीं, म्हणून जर म्हटलें तर योग्यांच्या इच्छेनें होणाऱ्या घटालाही माती, दंड, चक्र, इत्यादि कारणसामग्री व देहा-लाही स्त्री-पुरुषसंयोगादि सामग्री अवश्य लागते, असें म्हणावें लागेल; आणि त्यामुळें योग्यांची इच्छा होतांच तत्क्षणीं घट-पटादि कार्यें होतात असा जो अनुभव येतो तो सर्व असंभवनीय होतो. पण तेंच, चेतन भगवान् महामहेश्वर महादेवच स्वतंत्र असून तो पाहिजे तर आपल्या नियतीप्रमाणें चालतो किंवा एकादे वेळीं तिच्या विरुद्धही आचरण करतो, असें समजल्यास कोणत्याही प्रकारची अनुपपत्ति येत नाहीं. म्हणूनच वसुगुप्ताचार्यांनीं—

निरुपादानसंभारमभित्तावेव तन्वते ।
जगच्चित्रं नमस्तस्मै कलाश्लाघ्याय शूलिने ॥ १ ॥

अर्थ—उपादानकारणादि संभारावाचून निराधार जगच्चित्र निर्माण करणाऱ्या व त्या कलांनीं स्तुत्य झालेल्या शूलसंपन्न महेश्वराला नमस्कार असो. १ ‘ अहो पण प्रत्यगात्मा परमेश्वराहून भिन्न नाहीं, म्हणून जर म्हटलें तर त्याचा संसाराशीं संबंध कसा होणार ? ’ असा प्रश्न कराल तर त्याचें उत्तर आगमाधिकारांत असें दिलें आहे—

एष प्रमाता मायान्धः संसारी कर्मबन्धनः ।
विद्यादिज्ञापितैश्वर्यश्चिद्घनो मुक्त उच्यते ॥ १ ॥

अर्थ—हा प्रमाता मायेच्या योगानें अंध, संसारी व कर्मबंधानें युक्त होतो. पण विद्यादि उपायांच्या योगानें त्याच्या स्वाभाविक ऐश्वर्याचें ज्ञान करून दिलें असतां तो चिद्घन व मुक्त म्हटला जातो. १ ‘ अहो पण प्रमेय—प्रमाणाचा विषय—प्रमात्याहून निराळा नाहीं; तर तो तद्रू-

पच आहे, असें म्हटल्यावर बद्ध व मुक्त यांच्या अपेक्षेनें प्रमेयांमध्यें कोणता बिशेष असणार? वस्तुतः कोणताच विशेष असण्याचा संभव नाहीं,' असा प्रश्न कराल तर त्याचेंही उत्तर तत्त्वार्थसंग्रहाधिकारांत असें दिलें आहे—

मेयं साधारणं मुक्तः स्वात्माभेदेन मन्यते।
महेश्वरो यथा बद्धः पुनरत्यन्तभेदवत्॥ १॥

अर्थ—जसा महेश्वर तसाच मुक्तही प्रमेय साधारण आहे व तें स्वात्म्याहून भिन्न नाहीं, असें समजतो; आणि बद्ध तें अत्यंत भिन्न आहे, असें जाणतो. १ 'अहो पण आत्म्याचें परमेश्वरत्व जर स्वाभाविक आहे तर त्याच्या प्रत्यभिज्ञेची (म्हणजे ओळखीची) कांहीं गरजच नाहीं; कारण एकाद्या झाडाचें बीज आपण जरी न ओळखलें तरी अंकुरोत्पादक सामग्री मिळतांच त्यापासून अंकुरोत्पत्ति झाल्यावाचून रहात नाहीं. तेव्हां आत्म्याच्या प्रत्यभिज्ञानाविषयीं इतका आग्रह कशाला हवा?' म्हणून विचाराल तर त्यांतील रहस्य सांगतों तें ऐका— कोणत्याही वस्तूची अर्थक्रिया--फळ—दोन प्रकारची असते. एक बाह्य अंकुरादिक व दुसरी प्रमात्याची विश्रांति हेंच जिच्यांतील सार आहे अशी प्रीत्यादिरूप. त्यांतील पहिली अर्थक्रिया प्रत्यभिज्ञेची अपेक्षा करीत नाहीं. दुसरी तिची अपेक्षा करते. याच न्यायानें प्रकृतस्थळींही 'मी ईश्वर आहें,' अशा चमत्कारानें भरलेली परापरसिद्धिलक्षण जीवात्मैकत्व-शक्ति-विभूतिरूप अर्थक्रिया इष्ट आहे. तिच्यासाठीं स्वरूपाची ओळख अवश्य व्हावी लागते.

'अहो पण प्रमात्याची विश्रांति हेंच जिच्यांतील सार आहे, अशी अर्थक्रिया प्रत्यभिज्ञेवाचून कोठेंच अनुभवास येत नाहीं; तर ती प्रत्यभिज्ञेनेंच अनुभवास येते, असा अन्वयव्यतिरेक प्रतीतीला कोठें येतो?' म्हणून जर विचाराल तर सांगतो.—नायकाचे अनेक गुण ऐकल्यामुळें जिचें प्रेम अतिशय वाढलें आहे, अशी कोणी एक कामिनी मदनानें

विह्वल होऊन विरहदुःख सहन करण्यास असमर्थ होत्साती मदनलेखाचा अवलंब करते. त्याच्या द्वारा आपल्या प्रियकराला आपली अवस्था निवेदन करते. त्याचप्रमाणें वेगानें त्याच्या समीप जाऊनही व त्याला अवलोकन करूनही त्याच्या गुणांचा अनुभव न आल्यास तो आपला प्रियकर नव्हे; दुसराच कोणी साधारण पुरुष आहे असें समजते. त्यामुळें तो तिला हृदयंगम वाटत नाहीं. पण बरोबरच्या सख्यांच्या सांगण्यावरून त्याच्या गुणांचें भान झाल्यावर ती जेव्हां त्याला ओळखते तेव्हां तत्काल पूर्णभावास प्राप्त होते. या दृष्टान्ताप्रमाणें स्वात्मा विश्वेश्वररूपानें भासत असला तरी त्याच्या साधारण गुणांची जेव्हां ओळख नसते तेव्हां त्याच्याविषयीं पूर्णभाव होत नाहीं. पण गुरुवचनादिकांच्या योगानें परमेश्वराच्या सर्वज्ञत्व, सर्वकर्तृत्व इत्यादि गुणांच्या उत्कर्षाचें ज्ञान जेव्हां होतें तेव्हां तत्काल त्याला पूर्णात्मभाव प्राप्त होतो. चतुर्थ विमर्शामध्यें असेंच सांगितलें आहे—

तैस्तैरप्युपयाचितैरुपनतस्तस्याः स्थितोऽप्यन्तिके
कान्तो लोकसमान एवमपरिज्ञातो न रन्तुं यथा।
लोकस्यैष तथाऽनपेक्षितगुणः स्वात्मापि विश्वेश्वरो
नैवायं निजवैभवाय तदियं तत्प्रत्यभिज्ञोदिता ॥ १ ॥

अर्थ—अनेक प्रकारच्या प्रार्थनांनीं समीप आणलेला व नायिकेच्या समीप असलेलाही कान्त तिच्याकडून जर ओळखला गेला नाहीं तर तो आपला कान्त नव्हे, दुसराच कोणी साधारण पुरुष आहे, असें वाटून तो तिच्या आनंदाला कारण होत नाहीं. त्याच न्यायानें हा स्वात्मा विश्वेश्वरही त्याचे गुण व वैभव यांची जोंवर ओळख नसते तोंवर आपल्या स्वाभाविक वैभवाला प्राप्त होत नाहीं. त्यासाठीं या प्रत्यभिज्ञेची आवश्यकता आहे. १. असो; अभिनवगुप्तादि आचार्यांनीं हा सिद्धान्त फार विस्तारानें वर्णिला आहे. पण आह्मांला त्याचें संक्षेपतः

दिग्दर्शनच करावयाचें असल्यामुळें आम्ही त्याचा अधिक विस्तार करीत नाहीं.

---

## ४ रसेश्वरदर्शनसार.

दुसरे कांहीं माहेश्वर वस्तुतः परमेश्वराचें तादात्म्य संपादन करणें हाच परम पुरुषार्थ आहे, असें समजत असले तरी शरीर जर स्थिर राहिलें तरच सर्वांना संमत असलेली जीवन्मुक्ति सिद्ध होणार, असें मानून शरीरस्थैर्याचा उपाय रस हाच आहे, व त्या रसालाच पारद (पारा) इत्यादि दुसरीं अनेक नांवें आहेत, असें सांगतात. रस संसाराच्या परतीराला पोचविणारा असल्यामुळें त्याला पार--द (परतीर देणारा) असें ह्मणतात. ह्मणूनच—

**संसारस्य परं पारं दत्तैऽसौ पारदः स्मृत ।**

ह्मणजे संसाराचें परतीर देतो, ह्मणून याला पारद म्हटलेलें आहे, असें एके ठिकाणीं स्पष्ट वचन आहे. रसार्णवनांवाच्या ग्रंथांतही—

**पारदो गदितो यस्मात्परार्थं साधकोत्तमैः ।**
**सुप्तोऽयं मत्समो देवि मम प्रत्यङ्गसंभवः ॥ १ ॥**
**मम देहरसो यस्माद्रसस्तेनायमुच्यते ॥**

अर्थ—ज्याअर्थीं हा परार्थ आहे त्याअर्थीं उत्तम साधकांनीं याला पारद म्हटलें आहे. हे देवि, हा जेव्हां सुप्त ह्मणजे निश्चेष्ट असतो तेव्हां तो माझ्यासारखा असून माझ्या प्रत्येक अंगापासून याची उत्पत्ति झाली आहे. ज्याअर्थीं हा माझ्या देहाचा रस आहे त्याअर्थीं हा रस म्हणून म्हटला आहे.

'अहो पण दुसऱ्या प्रकारानेंही जर जीवन्मुक्ति संभवते तर हें तुमचें म्हणणें सयुक्तिक कसें होईल?' ह्मणून ह्मणाल तर तें बरोबर नाहीं. सहाही दर्शनांमध्यें मुक्ति देहपातानंतर--मरणानंतर--सांगितली आहे. त्यामुळें तिच्यावर सर्वांचाच विश्वास बसूं शकत नाहीं; आणि

त्यामुळें तिच्याकडे मनुष्याची निःसंदेह प्रवृत्तिही उपपन्न होत नाहीं. रसार्णवांत त्याविषयीं असें म्हटलें आहे—

षड्दर्शनेऽपि मुक्तिस्तु दर्शिता पिण्डपातने ।
करामलकवत्सापि प्रत्यक्षा नोपलभ्यते ॥
तस्मात्तं रक्षयेत्पिण्डं रसैश्चैव रसायनैः ॥ १ ॥

अर्थ—षड्दर्शनांतही मुक्ति शरीरपात झाल्यावर सांगितली आहे. त्यामुळें ती हातावर ठेवलेल्या आवळ्याप्रमाणें प्रत्यक्ष उपलब्ध होत नाहीं. यास्तव रस ( ह्मणजे पारा ) व रसायनें यांच्या योगानें त्या शरीराचें रक्षण करावें. १. गोविन्दभगवत्पादाचार्यांनींही—

इति धनशरीरभोगान्मत्वा नित्यान्सदैव यतनीयम् ।
मुक्तौ सा च ज्ञानात्तच्चाभ्यासात्स च स्थिरे देहे ॥ १ ॥

अर्थ—अशा रीतीनें धन, शरीर व भोग या सर्वांना नित्य समजून सर्वदा मुक्तीविषयीं यत्न करावा. ती मुक्ति ज्ञानानें होते. ज्ञान अभ्यासानें होतें व अभ्यास देह स्थिर असला तरच होऊं शकतो ? ' अहो पण हा दृश्य असलेला देह अत्यंत नाशवंत असल्यामुळें त्याला नित्यत्व प्राप्ति होणें, कसें संभवेल ? ' ह्मणून विचाराल तर सांगतों. रस, रक्त, मांस, इत्यादि सहाकोशांनीं युक्त असलेलें हें आमचें शरीर जरी अनित्य असलें तरी रस, अभ्रक इत्यादि नांवांनीं प्रसिद्ध असलेल्या आणि हर व गौरी यांच्या सृष्टींत झालेल्या देहांना नित्यत्व संभवतें. कारण रसहृदयांत तसें सांगितलें आहे—

ये चात्यक्तशरीरा हरगौरीसृष्टिजान्तरं प्राप्ताः ।
वन्द्यास्ते रससिद्धा मन्त्रगणः किंकरो येषाम् ॥ १ ॥

अर्थ—ज्यांनीं शरीराचा त्याग केलेला नसतो व जे हरगौरीसृष्टींत उत्पन्न झालेल्या रसाला प्राप्त होतात ते रससिद्ध पुरुष वंद्य आहेत. सर्व मंत्रसमूह हा त्यांचा किंकर आहे. १ यास्तव जीवन्मुक्तीची इच्छा करणाऱ्या योगी पुरुषानें प्रथम आपलें शरीर दिव्य करून घ्यावें. रस

हरापासून झालेला व अभ्रक गौरीपासून झालेलें आहे. म्हणून त्या दोघांनाही हरगौरीसृष्टिसंयोगजनितत्व आहे; ( ह्मणजे हर व गौरी यांच्या सृष्टीकरितां झालेल्या संयोगापासून ते दोन्ही पदार्थ उद्भवले आहेत; ) आणि त्यामुळेंच रसाला हरात्मक व अभ्रकाला गौर्यात्मक म्हटलें आहे.

अभ्रकस्तव बीजं तु मम बीजं तु पारदः ।
अनयोर्मेलनं देवि, मृत्युदारिद्र्यनाशनम् ॥ १ ॥

अर्थ—हे देवि पार्वति, अभ्रक तुझें बीज आहे व पारद ( पारा ) माझें बीज आहे. त्यामुळें या दोघांचा संयोग मृत्यु व दारिद्र्य यांचा नाश करणारा आहे. १. परंतु हें सुद्धां फार थोडें वर्णन केलें आहे. वस्तुतः देव, दैत्य, मुनि, मानव इत्यादिकांतील पुष्कळजण पाऱ्याच्या सामर्थ्यानें दिव्य देहाचा आश्रय करून जीवन्मुक्तीचा अनुभव घेत राहिले आहेत, असें सांगितलें आहे. रसेश्वरसिद्धान्तांत—

देवाः केचिन्महेशाद्या दैत्याः काव्यपुरःसराः ।
मुनयो वालखिल्याद्या नृपाः सोमेश्वरादयः ॥ १ ॥
गोविन्दभगवत्पादाचार्यो गोविन्दनायकः ।
चर्वटिः कपिलो व्यालिः कापालिः कन्दलायनः ॥ २ ॥
एतेऽन्ये बहवः सिद्धा जीवन्मुक्ताश्चरन्ति हि ।
तनुं रसमयीमाप्य तदात्मककथाचणाः ॥ ३ ॥

अर्थ—महेश्वरादिक कांहीं देव, काव्यप्रभृति दैत्य, वालखिल्यादि मुनी, सोमेश्वरादिक राजे, गोविंदभगवत्पूज्यपादाचार्य, गोविंदनायक, चर्वटि, कपिल, व्यालि, कापालि, कन्दलायन, व असेच दुसरेही अनेक सिद्ध रसमय शरीरास प्राप्त होऊन, रसात्मक गोष्टींनीं युक्त होत्साते जीवन्मुक्त दशेचा अनुभव घेत संचार करतात १–३ हाच अर्थ परमेश्वरानें परमेश्वरीला सविस्तर सांगितला आहे.—

कर्मयोगेन देवेशि प्राप्यते पिण्डधारणम् ।
रसश्च पवनश्चेति कर्मयोगो द्विधा स्मृतः ॥ १ ॥

मूर्च्छितो हरंति व्याधीन्मृतो जीवयति स्वयम् ।
बद्धः खेचरतां कुर्याद्रसो वायुश्च भैरवि ॥ २ ॥.

अर्थ—हे देवेशि, कर्मयोगानें पिण्डाचें धारण होतें. रस व पवन--वायु--असा कर्मयोग दोन प्रकारचा आहे. मूर्च्छित रस व वायु व्याधींचा नाश करतो. मृत रस व वायु मनुष्याला स्वतः जिवंत करतो. बद्ध झालेला रस व वायु आकाशसंचार करतो. १, २. मूर्च्छित रसाचें स्वरूप असें सांगितलें आहे.—

नानावर्णो भवेत्सूतो विहाय घनचापलम् ।
लक्षणं दृश्यते यस्य मूर्च्छितं तं वदन्ति हि ॥ १ ॥
आर्द्रत्वं च घनत्वं च तेजो गौरवचापलम् ।
यस्यैतानि न दृश्यन्ते तं विद्यान्मृतसूतकम् ॥

अर्थ—पारा आपलें अत्यंत चापल्य सोडून नानारंगाचा होतो, असें ज्या रसाचें लक्षण दिसतें त्याला मूर्च्छित ह्मणतात. १. ज्याचें आर्द्रत्व, घनत्व ( दाटपण ), तेज, जडपण व चंचलपण हीं दिसत नाहींत त्याला मृत रस जाणावें. दुसऱ्या एका ग्रंथांत बद्ध रसाचेंही लक्षण असें सांगितलें आहे—

अक्षतश्च लघुद्रावी तेजस्वी निर्मलो गुरुः ।
स्फोटनं पुनरावृत्तौ बद्धसूतस्य लक्षणम् ॥ १ ॥

अर्थ—अक्षत, मंदगतीनें चालणारा, तेजस्वी, निर्मल, जड, व परतविलें असतां फुटणारा, हीं सर्व बद्ध पाऱ्यांचीं लक्षणें आहेत. १. 'अहोपण, हर व गौरी यांच्या सृष्टीची सिद्धि झाली तरच शरीराचें स्थैर्य संपादन करतां येणें शक्य आहे. पण त्या सृष्टीचीच सिद्धि कशी होणार ?' ह्मणून विचाराल तर सांगतों—अठरा संस्कारांच्या योगानें शरीरस्थैर्याची सिद्धि होणें, अगदीं सयुक्तिक आहे. म्हणूनच आचार्यांनीं असें सांगितलें आहे—

तस्य हि साधनविधौ सुधियां प्रतिकर्मनिर्मलाः प्रथमम् ।
अष्टादश संस्कारा विज्ञातव्याः प्रयत्नेन ॥ १ ॥

अर्थ—त्या शरीराचें स्थैर्य व्हावें, म्हणून बुद्धिमानांना साधन करण्याचा प्रसंग आला असतां त्यांनीं अगोदर प्रत्येक कर्मानें निर्मल असे अठरा संस्कार मोठ्या यत्नानें समजून घ्यावे. १. ते संस्कार पुढील पद्यांत सांगितले आहेत.—

स्वेदन-मर्दन-मूर्च्छन-स्थापन-पातन-निरोध-नियमाश्च ।
दीपन-गगनग्रास-प्रमाणमथ जारणा पिधानम् ॥ १ ॥
गर्भद्रुति बाह्यद्रुति क्षारण-सरागसारणाश्चैव ।
क्रामणवेधौ भक्षणमष्टादशधेति रसकर्म ॥ २ ॥

अर्थ—स्वेदन, मर्दन, मूर्च्छन, पातन, निरोध, नियम, दीपन, गगनग्रास, प्रमाण, जारणा, पिधान, गर्भद्रुति, बाह्यद्रुति, क्षारण, सरागसारण, क्रामण, वेध, व भक्षण असें अठरा प्रकारचें रसकर्म आहे. १, २–या सर्व संस्कारांचा अर्थ सविस्तर व्याख्यानावाचून कळणार नाहीं. पण तें येथें करूं लागल्यास ग्रंथाचा फार विस्तार होईल. यास्तव आम्ही त्या भरीस पडत नाहीं. ज्या कोणाला स्वेदनादि संस्कार कसे करावे, हें समजून घ्यावयाचें असेल त्यांनीं प्राचीन ग्रंथांतून त्याविषयींची माहिती मिळवावी. गोविन्दभगवत्पादाचार्य, सर्वज्ञ रामेश्वरभट्टारक इत्यादिकांनीं याविषयीं पुष्कळ माहिती दिली आहे.

हें रसशास्त्र केवळ धातुवादासाठींच आहे, असें भलतेंच कांहीं तरी समजूं नये. कारण तें देहवेधाच्या द्वारा मुक्तिरूप परम प्रयोजनाला कारण होतें रसार्णवांत याविषयीं असें म्हटलें आहे.—

लोहवेधस्त्वया देव यदर्थमुपवर्णितः ।
तं देहवेधमाचक्ष्व येन स्यात्खेचरी गतिः ॥ १ ॥
यथा लोहे तथा देहे कर्तव्यः सूतकः सता ।
समानं कुरुते देवि, प्रत्ययं देहलोहयोः ॥
पूर्वं लोहे परीक्षेत पश्चाद्देहे प्रयोजयेत् ॥ २ ॥

अर्थ—हे देवा, तूं लोहवेध ज्याच्यासाठीं वर्णिला आहेस तो देह-

वेधच आतां सांग. ह्मणजे त्याच्यायोगानें आकाशांतून गमन करण्याची सिद्धि प्राप्त होईल. सुज्ञ पुरुषानें जसा लोहामध्यें तसाच देहामध्येंही पाऱ्याचा प्रयोग करावा. हे देवि, तो देह व लोह या दोघांच्याही ठिकाणीं एकसारखाच परिणाम करतो. यास्तव अगोदर त्याचा लोखंडावर प्रयोग करून परीक्षा पहावी व नंतर देहावर त्याचा प्रयोग करावा. ' अहोपण, सच्चिदानन्दात्मक परतत्त्वाच्या स्फुरणानेंच जर मुक्ति सिद्ध होत असेल तर या दिव्य देहाच्या संपादनाविषयींचा प्रयास कशाला हवा ? ' ह्मणून ह्मणाल तर तें बरोबर नाहीं. कारण स्थिर शरीराचा जर लाभ न झाला तर सच्चिदानन्दस्वरूपाच्या साक्षात्काराची वार्ताही बोलावयास नको. कारण शरीर असलें तर पुढें साक्षात्काराची आशा ! म्हणूनच रसहृदयांत असें ह्मटलें आहे—

गलितानल्पविकल्पः सर्वाध्वविवक्षितश्चिदानन्दः ।
स्फुरितोऽप्यस्फुरिततनोः करोति किं जन्तुवर्गस्य ॥ १ ॥
यं जरया जर्जरितं काशश्वासादिदुःखविशदं च ।
योग्यं तं न समाधौ प्रतिहतबुद्धीन्द्रियप्रसरम् ॥ २ ॥
बालः षोडशवर्षो विषयरसास्वादलम्पटः परतः ।
यातविवेको वृद्धो मर्त्यः कथमाप्नुयान्मुक्तिम् ॥ ३ ॥

अर्थ—ज्यांतील सर्व विकल्प नाहींसे झाले आहेत व जो सर्व मार्गांनीं विवक्षित आहे असा चिदानन्द जरी स्फुरला तरी तो ज्याचें शरीर स्फुरण पावलेलें नाहीं त्या प्राणिसमूहाला काय करणार ? ( शरीर विद्यमान असलें तर तो जीवांवर मोक्षरूपी उपकार करणार. पण तेंच जर नाहींसें झालें तर मग त्या झालेल्याही मोक्षाचा काय उपयोग ? ) १. जरेनें जर्जर झालेलें, खोकला, श्वास, इत्यादि व्याधींच्या दुःखानें व्याकुळ झालेलें व ज्यांतील ज्ञानेंद्रियांचें कार्य प्रतिबद्ध झालें आहे, असा देह समाधीला योग्य नाहीं, असें योगी म्हणतात. २. मनुष्य सोळा वर्षांपर्यंत बालक असतो. त्यापुढें विषयसुखाचा स्वाद घेण्यामध्यें लंपट

होतो; व म्हातारपणीं विवेकशून्य होतो. तेव्हां अशा स्थितींत त्याला मुक्ति कशी मिळणार ? ३. ' अहो पण जीवत्वालाच संसारित्व ह्मणतात. व मुक्तत्व त्याच्या उलट असतें. तेव्हां परस्पर विरुद्ध असलेल्या त्या दोघांची स्थिति एका शरीराच्या आधारानें कशी होऊं शकेळ ? ' म्हणून ह्मणाल तर तें बरोबर नाहीं. कारण मुक्ति सर्व शास्त्रकारांना संमत आहे. पण ती ज्ञेयकोटींत अन्तर्भूत होते कीं नाहीं ? जर होत नसेल तर ती सशाच्या शिंगाप्रमाणें असत् आहे, असें होतें; व कोणत्याही असत् पदार्थाचा वस्तुतः कांहींच उपयोग नसतो. बरें ती मुक्ति ज्ञेयकोटींत अन्तर्भूत होते, म्हणून म्हटलें तर जीवनाला सोडून चालत नाहीं. कारण जो जिवंत असतो तोच ज्ञेयाला जाणतो, असा नियम आहे. त्यामुळें मेल्यावर ज्ञेय मुक्तीचा अनुभव येणें शक्य नाहीं. बरें चिरजीवित शक्य नाहीं, ह्मणून ह्मणावें तर विष्णुस्वामिमतानुसारी लोक नृसिंहाचें शरीर नित्य आहे, असें समजतात, कारण साकारसिद्धींत—

सच्चिन्नित्यनिजाचिन्त्यपूर्णानन्दैकविग्रहम् ।
नृपञ्चास्यमहं वन्दे श्रीविष्णुस्वामिसंमतम् ॥१॥

अर्थ—सत्, चित्, नित्य, केवळ अचिन्त्य, पूर्ण निजानन्दस्वरूप व श्रीविष्णुस्वामीला संमत अशा नृसिंहाला मी वंदन करतों. ' अहो पण हें सावयव व रूपयुक्त दिसणारें नृसिंहाचें शरीर सत् आहे, असें ह्मणणें उपपन्न होत नाहीं, ' इत्यादि आक्षेप घ्याल तर तो बरोबर नाहीं. कारण ' सनकादिकांना प्रत्यक्ष दिसणारें, ' सहस्रशीर्षा पुरुषः ' इत्यादि श्रुति-वाक्यावरून व ' अद्भुतं बालकमम्बुजेक्षणं चतुर्भुजं शङ्खगदाद्युदायुधं ' इत्यादि पुराणवचनावरून सिद्ध होणारें नृसिंहस्वरूप असत् कसें असेल ? ' असें म्हणून श्रीविष्णुस्वामींच्या शिष्यांनीं वरील अक्षेपाचें निरसन केलें आहे. तस्मात् आम्हांला इष्ट असलेलें देहाचें नित्यत्व अत्यन्त अदृष्ट आहे, तें कोठेंच अनुभवास येणारें नाहीं, असें ह्मणणें अयोग्य आहे, असें

पुरुषार्थांची इच्छा करणाऱ्या पुरुषांनीं समजावें. म्हणूनच एके ठिकाणीं म्हटलें आहे–

आयतनं विद्यानां मूलं धर्मार्थकाममोक्षाणाम् ।
श्रेयः परं किमन्यच्छरीरमजरामरं विहायैकम् ॥ १ ॥

अर्थ–सर्व विद्यांचें आधार स्थान आणि धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांचें मूळ अशा एका अजरामर शरीराला सोडून दुसरें परम श्रेय काय असणार? १. आणि त्या शरीराला जरा-मरणरहित करण्यास समर्थ असा एक रसेंद्रच आहे. ह्मणूनच 'एकोऽसौ रसराजः शरीरमजरामरं कुरुते ।' म्ह० हा एक रसराजच शरीराला अजरामर करतो, असें ह्मटलें आहे. अहो या रसाचें माहात्म्य काय वर्णावें? त्याचें नुस्तें दर्शन घेतल्यानें किंवा त्याला स्पर्श केल्यानेंही महत्फळ प्राप्त होतें. रसार्णवांत म्हटलें आहे–

दर्शनात्स्पर्शनात्तस्य भक्षणात्स्मरणादपि ।
पूजनाद्रसदानाच्च दृश्यते षड्विधं फलम् ॥१॥
केदारादीनि लिङ्गानि पृथिव्यां यानि कानिचित् ।
तानि दृष्ट्वा तु यत्पुण्यं तत्पुण्यं रसदर्शनात् ॥२॥

अर्थ–पाऱ्याचें दर्शन घेतल्यानें, त्याला स्पर्श केल्यानें, त्याचें भक्षण केल्यानें, स्मरण केल्यानें, पूजन केल्यानें, व त्याचें दान केल्यानेंही सहा प्रकारचें फळ अनुभवास येतें १ पृथ्वीवर जीं कांहीं केदारादिक लिंगें आहेत त्यांचें दर्शन घेतल्यानें जें पुण्य लागतें तेंच पाऱ्याचें दर्शन घेतल्यानेंही लागतें. २. दुसऱ्या ग्रंथांतही 'काश्यादिसर्वलिङ्गेभ्यो रसलिङ्गार्चनं शिवं' ह्म० काशीप्रभृति इतर ठिकाणच्या सर्व लिंगांहून पाऱ्याच्या लिंगाचें पूजन करणें श्रेयस्कर आहे; व 'प्राप्यते येन तल्लिङ्गं भोगारोग्यामृतप्रदम्' म्ह० ज्याच्याकडून तें भोग, आरोग्य व अमृत देणारें लिंग प्राप्त केलें जातें (त्याचें कल्याण होतें), असें म्हटलें

आहे. पाप्याची निन्दा केल्यास मोठा दोष लागतो, असेंही सांगितलें आहे—

प्रमादाद्रसनिन्दायाः श्रुतावेनं स्मरेत्सुधीः ।
द्राक्त्यजेन्निन्दकं नित्यं निन्दया पूरिताशुभम् ॥१॥

अर्थ—प्रमादानें पाप्याची निन्दा कानीं पडल्यास सुज्ञानें त्याचें स्मरण करावें. निन्देनें ज्यानें आपलें हृदय अशुभानें भरून घेतलें आहे अशा निन्दकाचा त्यानें सतत त्याग करावा. १. तस्मात् आम्ही सांगितल्याप्रमाणें दिव्य देह संपादन करून योगाभ्यासानें श्रेष्ठ तत्त्वाचा साक्षात्कार संपादन केला असतां पुरुषार्थाची प्राप्ति होते; आणि ती झाली असतां—

भ्रूयुगमध्यगतं यच्छिखिविद्युत्सूर्यवज्जगद्भासि ।
केषांचित्पुण्यदृशामुन्मीलति चिन्मयं ज्योतिः ॥ १ ॥
परमानन्दैकरसं परमं ज्योतिःस्वभावमविकल्पम् ।
विगलितसकलक्लेशं ज्ञेयं शान्तं स्वसंवेद्यम् ॥ २ ॥
तस्मिन्नाधाय मनः स्फुरदखिलं चिन्मयं जगत्पश्यन् ।
उत्सन्नकर्मबन्धो ब्रह्मत्वमिहैव चाप्नोति ॥ ३ ॥

अर्थ—दोन भुवयांच्या मध्यप्रदेशीं असणारी आणि अग्नि, वीज व सूर्य, यांप्रमाणें जगाला प्रकाशित करणारी चिन्मय ज्योति कांहीं पुण्यवानांनाच प्राप्त होते १. ज्ञेय परम तत्त्व परमानन्दैकरस, श्रेष्ठ, ज्योतिःस्वरूप, निर्विकल्प, सकल क्लेशरहित, शान्त व स्वसंवेद्य आहे २. त्यांत आपल्या मनाला स्थिर करून, स्फुरण पावणारें सर्व चिन्मय जगत् पाहणारा योगी सर्व कर्मबंधांचा नाश करून येथेंच ब्रह्मत्वास प्राप्त होतो. ३. श्रुतींतही ‘ रसो वै सः । रसं ह्येवायं लब्ध्वाऽनन्दी भवति ।’ ह्मणजे तो परमात्मा प्रसिद्ध रस आहे; व या रसाला प्राप्त होऊन जीव आनन्दी होतो, असें वर्णन केलें आहे. यास्तव या संसारांतील दैन्य, दुःख इत्यादिकांतून पार जाण्याचा उपाय रस हाच आहे, ही गोष्ट सिद्ध झाली; आणि त्या रसाचें परब्रह्माशीं साम्य आहे, असें प्रति-

पादन करणारें ' यो ब्रह्मैव स दैन्यसंसृतिभयात्पायादसौ पारदः ' ह्मणजे जो स्वतः ब्रह्मच आहे तो हा पारद ( पारा ) आह्मांला दैन्य व संसारभय यांपासून तारो; आमचें रक्षण करो, हें वचन आहे.

---

## ५ मतभेद.

येथवर श्रीमन्माधवाचार्यांच्या सर्वदर्शनसंग्रहांतील नकुलीश-पाशुपतादि दर्शनांच्या आधारानें माहेश्वरांचीं चार मतें प्रतिपादिलीं. आतां त्यांतील प्रत्येकाशीं अद्वैतमताचा विरोध कोणकोणत्या बाबतींत आहे, तें सांगून हें आठवें दर्शन संपवितों. नकुलीश पाशुपत पाशुपतशास्त्राचा आश्रय करितात. परंतु तें शास्त्र वेद व स्मृति यांचें सर्वथा अनुकरण करणारें नाहीं. तर इतर वेदबाह्य आगमांप्रमाणें अंशतः ईश्वराज्ञारूप श्रुति-स्मृतींचें अनुकरण करून पुष्कळ अंशीं तद्विरुद्ध अर्थ प्रतिपादन करणारें आहे. आतां त्यांतही कांहीं भाग ग्राह्य आहे. पण तो श्रुतिस्मृतींवरूनही साधकाला कळण्यासारखा असल्यामुळें त्यासाठीं निराळा आगम व निराळें प्रस्थान आरंभण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. तें शास्त्र परम पुरुषार्थाच्या साधनभूत पांच पदार्थांचें प्रतिपादन करतें. त्यांत गुरूचें जें लक्षण सांगितलें आहे. ( पृष्ठ २ पहा ) तें वैदिकांना सर्वथा मान्य होणारें नाहीं. कारण पाशुपतांची वासचर्या, श्मशान देश, केवळ रुद्र हेंच उपास्य इत्यादि साधनांविषयीं मतभेद होणें, अगदीं अपरिहार्य आहे.. किंबहुना वैदिक लोक श्मशानासारखे देश साधनानुष्ठानाला अनुकूल आहेत असें कदापि ह्मणणार नाहींत. पण या असल्या सूक्ष्म भेदांकडे विशेष लक्ष न देतां आह्मी येथें प्रधान मतभेदांचेंच दिग्दर्शन करतों. उत्तर मीमांसेंत तटस्थ ईश्वरवादांचें खंडन केलें आहे. माहेश्वर व वैशेषिकादि हे तटस्थ ईश्वरवादी आहेत. कारण ते परमेश्वराला केवल निमित्त कारण मानतात. निमित्त-कारण ह्मणजे कर्ता, हें प्रसिद्ध आहे. पण उत्तरमीमांसेंतील ' पत्युरसामञ्जस्यात् ' इत्यादि पंचसूत्रात्मक अधिकरणानें शंकराचा-

यांदि भाष्यकारांनीं माहेश्वरांचें खंडन केलें आहे. माहेश्वरांचे शैव, पाशुपत, कारुणिकसिद्धान्ती व कापालिक असे चार भेद आहेत. रामानुजाचार्यांनीं कारुणिकसिद्धान्त्यांच्या जागीं कालामुख–माहेश्वरांची गणना केली आहे. या दर्शनांत आह्मी जे चार भेद वर्णिले आहेत तेही हेच होत. या चौघांचा इतर बाबतींत जरी मतभेद असला तरी ते सर्व महेश्वरप्रणीत सिद्धान्ताचे अनुयायी आहेत. ह्मणून त्या सर्वांना माहेश्वर हें साधारण नांव प्राप्त झालें आहे. महेश्वरानें कार्य, कारण, योग, विधि व दुःखान्त असे पांच पदार्थ पशूंची पाशांपासून सुटका होण्यासाठीं वर्णिले आहेत. त्यांतील कार्य ह्मणजे प्रधानादिकांचे महत्तत्त्व, अहंकार इत्यादि विकार; कारण ह्मणजे ईश्वर, योग ह्मणजे ध्यानादि, विधि ह्मणजे त्रिकालस्नानापासून गुढचर्येपर्यंत सर्व आचार व दुःखान्त ह्मणजे मोक्ष. त्याचप्रमाणें पशु ह्मणजे आत्मे; पाश ह्मणजे बंधन व पशुपति ह्मणजे ईश्वर. तो पशुपति जगाचा कर्ता आहे, असें ते ह्मणतात. अर्थात् त्यांच्या मतीं ईश्वर प्रधान व पुरुष यांचा अधिष्ठाता, या रूपानें जगाचें कारण आहे. पण तें बरोबर नाहीं. कारण तशी कल्पना करण्यांत फारशी समंजसता दिसत नाहीं. कोणतीही प्रामाणिक कल्पनाच समंजस असते. ईश्वर जगाचें निमित्त कारण आहे, याविषयीं कांहीं प्रमाणच नाहीं. आगम हें त्याविषयीं प्रमाण आहे, ह्मणून ह्मणाल तर तें सयुक्तिक नव्हे. कारण आगमांची एकवाक्यता होत नाहीं. बरें, आपापल्या आगमाप्रमाणें प्रत्येकानें ईश्वराविषयीं निर्णय करावा, ह्मणून ह्मटलें तर मूळ प्रमाणविरहित आगमही अप्रमाण ठरतो. बरें, 'कोणत्याही आगमाचा कर्ता सर्वज्ञ असतो. त्यामुळें त्याचें ज्ञान हेंच त्या त्या आगमाचें मूळ आहे,' ह्मणून म्हणावें तर शैवादि आगमांचे कर्ते सर्वज्ञ होते, असें समजण्यास कांहीं आधार नाहीं. तो तो आगम हेंच त्याविषयीं प्रमाण आहे, ह्मणून समजावें, तर अन्योन्याश्रय दोष येतो. म्हणजे आगम सर्वज्ञानें केलेला आहे, असें समजलें तर मग तो

प्रमाण आहे असें ठरणार आणि तो प्रमाण आहे, असें ठरलें ह्मणजे मग त्यावरून त्याच्या सर्वज्ञ कर्त्याची सिद्धि होणार. पण अशा रीतीनें एकमेकांवर अवलंबून असलेला कोणताच सिद्धान्त सिद्ध होत नाहीं, हें प्रसिद्ध आहे. दुसरी गोष्ट अशी कीं कोणत्याही मनुष्याचें वचन स्वतः-प्रमाण असूं शकत नाहीं. कारण अनेक मनुष्यें जर एकच गोष्ट सांगूं लागलीं तर त्यालाही प्रमाण म्हणण्याकडे इतरांची प्रवृत्ति होईल! पण जेथें अनेकांचा परस्परविरोध स्पष्ट भासतो तेथें तत्त्वनिश्चय होणें अशक्यच असतें.

सर्वज्ञ ईश्वर केवळ कर्ताच आहे, हा सिद्धान्त अनुमानानें सिद्ध होईल, असें ह्मणावें तर निर्दोष अनुमानही करतां येत नाहीं. कारण अनुमान नेहमीं दृष्टानुसार असतें. त्यामुळें त्यावरून सिद्ध होणारी गोष्ट दृष्टार्थाच्या उलट कधींच असूं शकत नाहीं. त्यामुळें अनुमानानेंच जर जगत्कर्त्याची सिद्धि करूं लागलें तर व्यवहारांत आपण जशा प्रकारचे कर्ते पाहतों तशाच प्रकारच्या जगत्कर्त्याची सिद्धि त्यावरून होईल. जगांतील घट-पटादि कार्यांचे कर्ते राग-द्वेषादि दोषांनीं युक्त असतात. यास्तव जगत्कर्ताही तसाच असेल, असेंच अनुमान होण्याचा संभव आहे. बरें, ‘ व्यवहारांत मोठमोठीं राजगृहासारखीं विचित्र कार्यें करणारे अनेक कर्ते असतात. कारण तसलीं कार्यें कोणाही एका कारागिराला करतां येत नाहींत; जगत् हेंही विचित्र कार्य आहे; त्यामुळें त्याचे कर्ते अनेक असले पाहिजेत, असें जरी अनुमानानें सिद्ध झालें तरी कल्पना-गौरव या दोषाचें निरसन करण्याकरितां आम्ही जगत्कर्ता एक, सर्वज्ञ व निर्दोष आहे अशी कल्पना करतों; ’ म्हणून म्हणाल तर गौरव दोषाच्या निरसनाकरितां त्या अलौकिक कर्त्याचे ठिकाणीं लौकिक कर्त्यामध्यें नसलेल्याही एकत्वादिकांची कल्पना जशी करता तशीच, आणखीही थोडेसें लाघव होण्याकरितां तो कर्ताच द्रव्याचें उपादान कारणही आहे, अशी कल्पना जर केली तरच तें खरें लाघव होणार; नाहीं तर

जगांत अनुभवास येणाऱ्या या जड द्रव्याच्या स्वतंत्र प्रकृतीची निराळी कल्पना करावी लागते; व त्याप्रमाणें सांख्यांनीं प्रकृतीची, व बौद्धादिकांनीं परमाणूंची कल्पना केलीही आहे. पण दोन भिन्न कारणें मानण्यापेक्षां एकच अनेक विचित्रशक्तियुक्त कारण मानणें, यांत अधिक लाघव आहे. परंतु 'कर्ताच उपादान कारण आहे, असा अनुभव कोठेंच येत नाहीं, ह्मणून तशी कल्पना करतां येत नाहीं,' असें ह्मणाल तर त्याच न्यायानें कर्ता एकच असतो, तो सर्वज्ञ असतो, इत्यादि गोष्टींचाही व्यवहारांत अनुभव येत नसल्यामुळें जगत्कर्त्याच्या एकत्वादिकांचीही सिद्धि होऊं शकत नाहीं. असें जर आहे तर तुम्हां वैदिकांच्या मतीं तरी ईश्वराचा निर्णय कसा होतो? म्हणून विचाराल तर सांगतों. आह्मी ज्याला प्रमाण मानतों तो वेद अपौरुषेय आहे. त्यामुळें त्याचें प्रमाण्य स्वतःसिद्ध आहे. परतःसिद्ध नाहीं. म्हणूनच त्या वेदप्रतिपाद्य प्रमेयाच्या सिद्धीला लौकिक दृष्टान्ताची अपेक्षा नसते. त्यामुळें श्रुतीवरून लौकिक कर्त्याहून निराळ्या प्रकारच्या कर्त्याची सिद्धि होते; आणि एकदा अभिन्ननिमित्तोपादान, सर्वज्ञ व निर्दोष ईश्वराचा निर्णय झाला ह्मणजे मग इतर प्रमाणांचा बाधच होत असल्याकारणानें त्याच्या ठिकाणीं राग-द्वेषादि दोषांचा आरोप होऊं शकत नाहीं. अनुमानानें ईश्वराची सिद्धि करणारे वादी व अपौरुषेय वेदवादी यांच्या ईश्वरविषयक कल्पनेमध्यें हें असें अन्तर आहे. तस्मात् हीन, मध्यम व उत्तम अशी तीन प्रकारची प्रजा निर्माण करणाऱ्या आगमसिद्ध ईश्वराच्या ठिकाणीं राग-द्वेषादि दोषांची प्रसक्ति होत असल्यामुळें तो आम्हांप्रमाणेंच अनीश्वर होईल.

बरें, या दोषाचा परिहार करण्यासाठीं 'प्राण्यांच्या कर्मांनीं ज्याला प्रेरणा केली आहे, असा ईश्वर विषम सृष्टि उत्पन्न करतो, तो स्वेच्छेनें कांहीं तसें करीत नाहीं,' ह्मणून ह्मणावें तर तें सयुक्तिक दिसत नाहीं. कारण कर्म जड आहे. त्यामुळें तें प्रेरक होऊं शकत नाहीं. बरें, 'ईश्वरानें

ज्याला प्रेरणा केली आहे, असें कर्म ईश्वराला विषम सृष्टि करावयास लावतें,' ह्मणून ह्मणावें, तर त्यावर ईश्वर अगोदर कर्माला प्रेरणा करतो व नंतर तेंच ईश्वरप्रेरित कर्म त्या ईश्वराला प्रेरणा करतें, असा अन्योन्याश्रय दोष येतो. शिवाय ईश्वर करुणापराधीन व नित्यतृप्त आहे. त्यामुळें त्यानें प्राण्यांना जरी प्रेरणा केली तरी तो त्यांना सुखकर पुण्य कर्मेंच करावयास लावील. दुःखावह पापकर्में करावयास लावणार नाहीं. कदाचित् प्राण्यांचीं प्राक्तन पापें जरी फलोन्मुख झालीं तरी त्यांमुळें जीवांना दुःख होईल या भीतीनें दयाळु ईश्वर त्यांना तीं भोगावयास लावणार नाहीं, आणि त्यामुळें त्यांना दुःखही होणार नाहीं. बरें, लोक आपापल्या पूर्वकर्माप्रमाणें स्वतंत्रपणेंच पापांचा भोग घेतील, ह्मणून ह्मणावें तर तेंही बरोबर नाहीं. कारण लोक स्वतंत्र नाहींत. ते ईश्वराधीन आहेत.

बरें 'पूर्व कर्म ईश्वराला प्रस्तुत कर्मांत प्रवृत्त करतें, व त्यामुळें परमेश्वर जीवाला प्राक्तन कर्माचें फळ भोगण्यासाठीं वर्तमानकर्मांत प्रवृत्त करतो; आणि ही प्रवर्त्यप्रवर्तकत्वपरंपरा अशीच अविच्छिन्न चालत असल्यामुळें अन्योन्याश्रय दोष येत नाहीं,' म्हणून जर म्हटलें तर तेंही फारसें समाधानकारक नाहीं. कारण पूर्व कर्मानें परमेश्वराला स्वतंत्रपणें जर वर्तमानकर्मांत प्रवृत्त केलें असतें तर हें तुमचें म्हणणें सयुक्तिक दिसलें असतें. पण कर्म जड आहे, हें आम्ही वर सांगितलेंच आहे. त्यामुळें तें स्वतंत्रपणें प्रेरक होऊं शकत नाहीं. कर्म व ईश्वर परस्पर सापेक्ष आहेत, म्हणून म्हटलें तर अनवस्था होते व ईश्वराचें स्वातंत्र्य उरत नाहीं. यास्तव ईश्वर कर्मावाचून या विषम जगाला निर्माण करतो, असें त्याला केवळ निमित्त करण ह्मणणाऱ्या तटस्थ ईश्वरवाद्यांना ह्मणावें लागतें. पण तें असमंजस आहे.

बरें, ईश्वर केवळ करुणेनेंच जगत्कर्ता होतो, ह्मणून म्हणावें, तर तेंही समंजस दिसत नाहीं. कारण करुणा दुःखाचें मूळ आहे. त्यामुळें ती ज्याच्या अंतःकरणांत उत्पन्न होते त्याला दुःखी करते. ह्मणून मनुष्य

त्या दुःखाच्या निवृत्तीकरितांच कोणत्याही कार्यांत प्रवृत्त होतो. अर्थात् त्याची करुणेनें होणारी प्रवृत्तिही स्वार्थासाठीं आहे; परार्थाकरितां नव्हे. पण ईश्वर स्वार्थासाठीं प्रवृत्त होतो ह्मणून ह्मणणें अगदींच असमंजस दिसतें. कारण मग त्याला ईश्वर तरी कसें म्हणावयाचें!

दुसरें असें कीं ईश्वर केवळ कर्ता आहे, असें म्हटलें कीं जगाचें उपादान कारण दुसरेंच कांहीं तरी मानणें भाग आहे. पण तें प्रधान, परमाणु इत्यादिकांतील कांहीं जरी मानलें तरी त्याचा व कर्त्या ईश्वराचा संबंधच होऊं शकत नाहीं. सामान्यतः संबंध दोन प्रकारचा मानलेला आहे. एक संयोग व दुसरा समवाय. पण त्यांतील पहिला संयोग–संबंध दोन सावयव पदार्थांचाच होतो. त्याचप्रमाणें ज्यांचा संयोग व्हावयाचा ते पदार्थ असर्वगत असावे लागतात. आकाशासारख्या निरवयव व सर्वगत पदार्थांचा संयोग संभवत नाहीं. हात व पुस्तक हे दोन्ही पदार्थ सावयव आहेत व सर्वगतही नाहींत; तर परिच्छिन्न, एकदेशीं राहणारे आहेत. त्यामुळें त्यांचा संयोग संभवतो. तसाच कोणताही संयोग अव्याप्यवृत्ति असतो. ह्मणजे तो ज्या दोन किंवा अधिक पदार्थांचा झालेला असतो त्यांना सर्वत्र व्यापून रहात नाहीं. तर त्यांच्या कांहीं भागांतच राहतो. जसें–हात व पुस्तक यांचा संयोग सर्व हाताला व सर्व पुस्तकाला व्यापीत नाहीं. तर त्यांच्या कांहीं भागालाच व्यापतो, हें प्रसिद्ध आहे. त्यामुळें सर्वगत व निरवयव ईश्वर आणि सर्वगत व निरवयवच प्रधानादि उपादान यांचा संबंध होऊन कुंभार जसा मातीच्या गोळ्याला घटरूप कार्यांत प्रवृत्त करतो त्याप्रमाणें केवळ कर्ता ईश्वर उपादान कारणाला जगत्कार्यांत प्रवृत्त करूं शकत नाहीं. माहेश्वरही ईश्वराला निरवयव मानतात, हें प्रसिद्ध आहे.

बरें ईश्वर व जगाचें उपादान कारण यांचा समवाय संबंध आहे, ह्मणून ह्मणावें तर तेंही माहेश्वरादि तटस्थ ईश्वरवाद्यांच्या मतीं संभवत नाहीं. कारण जे दोन पदार्थ एकमेकांना सोडून कधींच राहूं शकत

नाहींत त्यांचा समवायसंबंध असतो. त्या दोन पदार्थांतील एक पदार्थ (धर्मी) आधार असतो व दुसरा (धर्म) आधेय असतो. पण ईश्वर व उपादान कारण या दोन स्वतंत्र पदार्थांचा समवायही संभवत नाहीं. बरें, त्यांचा योग्यतारूप कार्यगम्य संबंध मानावा-तर त्या दोघांचा कार्य-कारणभावच अद्यापि सिद्ध झालेला नसल्यामुळें तसेंही मानतां येत नाहीं.

शैवागमांत मुद्रिका षट्कादि धारण करणें, इत्यादि मोक्षांचीं साधनें सांगितलीं आहेत. कण्ठिका, रुचक, कुण्डल, शिखामणि, भस्म व यज्ञोपवीत हें मुद्राषट्क असून या मुद्रांनीं ज्यांनीं आपले देह मुद्रित केले आहेत ते पुनरपि या संसारांत जन्म घेत नाहींत, असे कापालिकांचें ह्मणणें आहे. कपालपात्रांत जेवणें, शवाच्या भस्मानें स्नान करणें, तें भस्म पाण्यांत कालवून पिणें, हातांत कुबडी घेणें, सुराकुंभाची स्थापना करून त्याच्या आधारानें राहणाऱ्या देवांची पूजा करणें, हें सर्व ऐहिक व पारलैकिक सर्व फलांचें साधन आहे, असेंही कित्येक शैव समजतात; व ' रुद्राक्षकङ्कणं हस्ते जटा चैका च मस्तके । कपालं भस्मना स्नानं०' इत्यादि शैवागमांतील वचन त्याला प्रमाण आहे. त्याचप्रमाणें एकाद्या विशेष कर्मानें हीन जातीच्या लोकांनाही ब्राह्मण्याची व उत्तमाश्रमाची प्राप्ति होते, असेंही त्यांचें ह्मणणें आहे. कारण ' दीक्षाप्रवेशमात्रेण ब्राह्मणो भवति क्षणात् । कापालं व्रतमास्थाय यतिर्भवति मानवः ' ह्मणजे मनुष्य नुस्ता शैवदीक्षेत प्रवेश करतांच तत्काल ब्राह्मण होतो आणि कापाल व्रत धरतांच तो यति होतो, असें आगमांत स्पष्ट म्हटलें आहे. परंतु हें सर्व वेदविरुद्ध आहे. त्यामुळें अवैदिक तत्त्वें, उपासना व आचार यांचा उपदेश करणारें पाशुपत मत आदर करण्यास योग्य नाहीं.

शैव पशुपतीला अशरीर मानतात. त्यामुळें तो जगत्कारणाचा अधिष्ठाताही होऊं शकत नाहीं. कारण कुंभारादि लौकिक अधिष्ठाते सशरीर असतात, हें सुप्रसिद्ध आहे. त्यावरून शरीरयुक्त कर्तेच उपादान

कारणाचे अधिष्ठाते होण्यास समर्थ असतात, असें अनुमान होतें, पण ईश्वर सशरीर आहे, ह्मणून म्हटलें तर त्याचें तें सावयव शरीर नित्य आहे कीं अनित्य, असा प्रश्न उपस्थित होतो; पण सावयव शरीर नित्य असणें युक्त नव्हे; ह्मणून त्याला अनित्य ह्मणावें तर त्या शरीराचें त्याहून निराळें कारण त्यावेळीं विद्यमान असतें, असें समजण्यास कांहीं प्रमाण नाहीं; आणि ते असल्यावाचून कोणतेंही कार्य अनित्य ठरत नाहीं.

'अहो पण भोक्ता जीव जरी अशरीर असला तरी तो जसा इंद्रियें, शरीर इत्यादिकांचा अधिष्ठाता होतो त्याप्रमाणें महेश्वर शरीररहित असला तरी उपादान कारणाचा अधिष्ठाता होऊं शकतो,' असें ह्मणाल तर तेंही सयुक्तिक नाहीं. कारण जीव पुण्यपापरूप कर्मांचें फळ भोगण्यासाठीं पुण्यपापापासून उत्पन्न झालेल्या अदृष्टामुळें इंद्रियें व शरीर यांचा अधिष्ठाता होतो. पण ईश्वरही त्याच न्यायानें प्रकृतीचा अधिष्ठाता होतो ह्मणून ह्मटल्यास तोही पुण्यपापरूप अदृष्टानें युक्त असून त्याचें फळ भोगतो, असें समजणें भाग पडतें. पण तें सयुक्तिक दिसत नाहीं. यास्तव पशुपति प्रकृतीचा अधिष्ठाता होऊं शकत नाहीं. त्याचप्रमाणे पशुपति पुण्यपापरूप अदृष्टानें युक्त आहे, असें म्हटल्यास तोही जीवाप्रमाणें उत्पत्ति, विनाश इत्यादिकांचें आस्पद आहे व असर्वज्ञ आहे, असें होईल. यास्तव हें पाशुपत मत आदर करण्यासारखें नाहीं.

येथवर पाशुपत व शैव यांच्या मताचें थोडक्यांत निरसन केलें. आतां प्रत्यभिज्ञा माहेश्वराच्या मुख्य सिद्धान्ताचें खंडन करतों. ते परश्वराच्या विशेष इच्छेनें जगाची उत्पत्ति मानतात; पण ईश्वराला विशेष इच्छा तरी कां व्हावी, याचें सयुक्तिक कारण सांगत नाहींत. केवळ प्रत्यभिज्ञा ह्मणजे ओळख हेंच पर व अपर पुरुषार्थाचें साधन आहे, असें ते म्हणतात; व प्रत्यभिज्ञाशास्त्राचाच अभ्यास करण्याविषयीं साधकाला आग्रह करितात. कारण त्या शास्त्रांत चर्या, प्राणायाम इत्यादि क्लेशकर

साधनांचा उपदेश केलेला नाहीं त्यामुळें तें सर्वांना सुलभ झालें आहे, असें त्याचें ह्मणणें आहे. पण ईश्वराच्या स्वरूपाचा साक्षात्कार झाल्यावाचून त्याची प्रत्यभिज्ञा ह्मणजे ओळख कशी पटणार ? ती पटल्यावर मग आचार, प्राणायाम इत्यादि क्लेशकर साधनांची कांहीं आवश्यकता नाहीं, हें खरें; पण ती होण्यापूर्वींही त्यांची आवश्यकता नाहीं, असें कसें ह्मणतां येईल ! कारण त्या साधनांच्या अनुष्ठानानें चित्त शुद्ध झालें ह्मणजे मग परमेश्वराच्या स्वरूपाचा साक्षात्कार होतो व त्यानंतर पुनः जेव्हां जेव्हां अन्तर्मुख चित्त त्याला विषय करतें तेव्हां तेव्हां त्याची प्रत्यभिज्ञा होते, असें समजणेंच सयुक्तिक दिसतें. कारण प्रत्यभिज्ञाही स्मरणाप्रमाणेंच अनुभवपूर्वक होते. स्मरण जसें न अनुभविलेल्या विषयाचें होत नाहीं तशीच प्रत्यभिज्ञाही अननुभूत विषयाची होऊं शकत नाहीं. शिवाय प्रत्यभिज्ञा क्षणिक असते. त्यामुळें ती अक्षणिक ( नित्य ) मोक्षाचें कारण होऊं शकत नाहीं. तर नित्य ज्ञानच मोक्षाचें कारण आहे, असें समजणें सयुक्तिक दिसतें.

पण प्रत्यभिज्ञावादी माहेश्वर प्रत्यभिज्ञेचें जें स्वरूप सांगतात तें साक्षात्काराहून निराळ्या प्रकारचें आहे, असें मुळींच वाटत नाहीं. कारण एका कामिनीचें उदाहरण देऊन तें ज्या प्रत्यभिज्ञेचें वर्णन करितात ( पृ. ३३ पहा ) ती प्रत्यभिज्ञा म्हणजे प्रतिबंधनिवृत्ति झाल्यावर होणारा साक्षात्कारच आहे. यास्तव प्रतिबंधनिवृत्तीसाठीं वेदोक्त उपायांचें अनुष्ठान करणेंच सर्वथा उचित आहे.

चवथे रसेश्वर माहेश्वर शरीर स्थिर करण्यासाठीं रसाचा उपयोग करावा, असें म्हणतात. तो रस संसारांतून तारून पार नेणारा असल्यामुळें पारद होय. तो महेश्वराच्या शरीराचा रस आहे; जीवन्मुक्ति त्याच्या सेवनानेंच मिळणें शक्य आहे. न्याय, योग, वेदान्त इत्यादि शास्त्रांनीं सांगितलेली मुक्ति प्रत्यक्ष नाहीं तर ती परोक्ष आहे. यास्तव रस ( पारा ) व रसायन यांच्या योगानें शरीराला दृढ व अजरामर करून

जीवन्मुक्तीचा साक्षात् अनुभव घ्यावा, शरीराला दृढ करून दोन भुवयांच्या मध्यभागीं ज्योतिःस्वरूप परमेश्वराचें ध्यान केलें असतां साधक येथेंच ब्रह्मस्वरूप होतो, इत्यादि त्यांचें ह्मणणें आहे. त्यावर आम्ही असें विचारतों कीं सावयव शरीर पाऱ्यानें जर स्थिर होत असेल तर आजपर्यंत एकाद्याही साधकानें त्याला स्थिर करून जगाला प्रत्यक्ष उदाहरण कां घालून दिलें नाहीं? निदान रसेश्वर माहेश्वरांतील एकाद्यानें तरी तसें करावयास पाहिजे होतें. म्हणजे त्या दर्शनावर पुष्कळांचा विश्वास बसला असता! पण आजवर पाऱ्यामुळें ज्याचें शरीर अजर व अमर झालें आहे असा एकादा रसेश्वरही त्या गोष्टीची साक्ष द्यावयास विद्यमान नाहीं. त्यामुळें शरीराचें नित्यत्व जरी सर्वांना इष्ट असलें तरी तें साध्य होण्यासारखें आहे, असें वाटल्यावाचून रसपान करण्याकडे फारशी कोणाची प्रवृत्ति होणार नाहीं.

दुसरें असें कीं शरीर जर केव्हांना केव्हां तरी मरणार, हें निश्चित आहे, तर त्याला पारदादिकांच्या संस्कारानें स्थिर करण्याचा यत्न करण्यांत काय अर्थ आहे? त्यापेक्षां मन्वादि स्मृतिकारांनीं सांगितल्याप्रमाणें श्रौत-स्मार्त कर्मानुष्ठान, वेदाध्ययन इत्यादि उपायांनीं पूर्णायु होणें काय वाईट? कारण त्यांच्या योगानें एकाच वेळीं दोन फळें मिळतात. एक तर चित्तशुद्धि व दुसरें आयुर्वृद्धि. शिवाय शरीर नुस्तें स्थिर झाल्यानें जीवन्मुक्ति कशी प्राप्त होणार? कारण शरीरस्थैर्य हा कांहीं मुक्तीचा उपाय नव्हे. तर ज्ञान हाच मुक्तीचा उपाय आहे. यास्तव त्याच्या साधनांच्या अनुष्ठानाकरितां सुदृढ व दीर्घायु जीविताची जरी अपेक्षा असली तरी 'न ह वै सशरीरस्य सतः प्रियाप्रिययोरपहतिरस्ति' म्हणजे सशरीर असलेल्या जीवाच्या–प्रिय सुख व अप्रिय दुःख–यांचा क्षय संभवत नाहीं, अशी श्रुति असल्यामुळें ज्ञानानंतरचें आयुष्य अति दीर्घ असण्यापेक्षां तें अति अल्प असणेंच श्रेयस्कर आहे. कारण शरीर असेपर्यंत सुख-दुःख होणार, हें अगदीं उघड आहे. तेव्हां तसल्या दुःख-

मूल देहाला मुद्दाम पाऱ्यासारखे पदार्थ खाऊन पुष्कळ दिवस जगांत ठेवणें, हें कांहीं मोठेंसें विचाराचें काम नव्हे.

आतां ज्ञानोपयोगी शरीरस्वास्थ्य कोणत्याही पुरुषार्थाला अवश्य असल्यामुळें शुद्धाचरणासारख्या सौम्य उपायांनींच तें स्थिर राहील असें करणें अधिक हितावह आहे. यास्तव त्याविषयीं आमचाही मतभेद नाहीं. पण नुस्तें दीर्घ जीवित हाच कांहीं पुरुषार्थ नव्हे. यास्तव त्यासाठींच सर्व उपाय करणें सर्वथा अप्रशस्त आहे. योगसाधनाकरितां शरीरस्थैर्याची आवश्यकता आहे, असें कोणी म्हणेल तर तें अंशतः खरें आहे. पण ध्यानादि प्रधान साधनाला विसरून अगोदर अप्रधान शरीरस्थैर्यासाठीं यत्न करणें म्हणजे लोण्याच्या गोळ्याकडे दुर्लक्ष करून त्यांतून गळणाऱ्या ताकाला खालीं पडूं न देण्यासाठीं यत्न करणेंच आहे. तात्पर्य अशा रीतीनें माहेश्वरांचीं सर्व मतें न्यूनाधिक प्रमाणानें वेदविरुद्ध आहेत. त्यांचे आचार फारसे शुद्ध नाहींत. तत्त्वज्ञानही वैदिक तत्त्वज्ञानाइतकें उदात्त नाहीं. त्यांच्या मतांतही कांहीं गुण आहेत; पण ते वैदिकांना अपूर्व नाहींत. यास्तव श्रीशंकराचार्य, श्रीरामानुजाचार्य इत्यादि आचार्यांनीं आपापल्या भाष्यांत म्हटल्याप्रमाणें माहेश्वरांचें मत व शैवागम सर्वथा आदरणीय नाहींत.

हें प्रकरण संपविण्यापूर्वी येथें आणखीं एका गोष्टीचा उल्लेख करणें अवश्य वाटतें. तो असा—दक्षिण हिंदुस्थानांत शैव म्हणून जें प्रसिद्ध आहेत ते भागवत, सौर, गाणपत्य इत्यादिकांप्रमाणेंच वैदिक आहेत; व ते कांहीं गाणपत्यादिकांप्रमाणेंच अद्वैतीही आहेत. प्रसिद्ध अप्पैयादीक्षित हे शैव म्हणून जगजाहीर आहेत. तथापि ते द्वैती नव्हते हेंही त्यांच्याच विविध ग्रंथांवरून व्यक्त होतें. यास्तव वैदिकांमध्यें जो शैव म्हणून एक प्रकार आहे तो भगवानाचे जे उपासक ते भागवत, सूर्याचे जे उपासक ते सौर, गणपतीचे जे उपासक ते गाणपत्य या न्यायानें शिवाचे उपासक म्हणून शैव होत. माहेश्वरांतील शैव नव्हेत.

कारण तेही भागवतादिकांप्रमाणें पंचायनपूजा करितात. वेदाध्ययन व शास्त्राध्ययन करतात. वर्णाश्रमधर्म मानतात. स्मार्त संस्कार करितात व जीवशिवांचें ऐक्य प्रतिपादितात. त्यामुळें त्यांना वेदबाह्य म्हणतां येत नाहीं. ते पार्थिव शिवलिंगाचें अर्चन करितात व अग्निहोत्रांतील भस्म लावितात. चिताभस्म, श्मशानवास इत्यादिकांना तेही आम्हां-प्रमाणेंच अपवित्र समजतात. तस्मात् हे शैव माहेश्वरांहून अगदीं निराळेच आहेत. माहेश्वर अवैदिक असून हे वैदिक आहेत. यास्तव श्रीशंकराचार्यादिकांनीं उत्तरमीमांसेच्या दुसऱ्या अध्यायांत ' पत्युरसामञ्जस्यात् ' ( पाद २ सू. ३५ ) इत्यादि पत्यधिकरणामध्यें ज्यांचें खंडन केलें आहे ते अवैदिक माहेश्वर होत; वैदिक शैव नव्हेत. वैदिक शैव तान्त्रिक आहेत.

पुष्कळ लोक शंकराचार्यांच्या अनुयायांना शैव, स्मार्त व रामानुजाचार्यादिकांच्या अनुयायांना भागवत, वैष्णव असें समजतात. पण तें बरोबर नाहीं. उलट शंकराचार्यांच्या भाष्यांत शिवलिंगापेक्षां विष्णूच्या शालग्रामशिलेचाच उल्लेख पुष्कळ वेळां आला आहे. श्रीविद्यारण्यांनींही पंचदशींत ' प्रतिमादिषु विष्णुत्वे को वा विप्रतिपद्यते ' ( प्र. ९-श्लो. २२ उत्तरार्ध ) म्हणजे शालग्रामशिला, चतुर्भुज श्यामसुंदर मनुष्याकार मूर्ति इत्यादि प्रतिमांच्या विष्णुत्वाविषयीं साशंक कोण होतो ? कोणीच नाहीं. असें म्हणून विष्णुप्रतिमेचाच दृष्टान्त दिला आहे. यास्तव शैव व भागवत हे दोन्ही तान्त्रिक असून स्मार्त तान्त्रिक कर्मांपेक्षां स्मृतिप्रोक्त आचारांना अधिक महत्त्व देणारे आहेत. भागवत व वैष्णव यांच्यामध्येंही थोडासा फरक आहे, असें दिसतें. ज्यांनीं वैष्णवी दीक्षा घेतलेली असते त्यांनाच वैष्णव म्हणणें उचित आहे. सर्वच भागवत वैष्णवी दीक्षा घेतलेले नसतात. तर ते आपल्याला केवळ पूर्व परंपरेनें भागवत समजतात. परंतु वस्तुतः स्मार्त व तान्त्रिक ( शैव, भागवत, वैष्णव ) असे वैदिकांचे मुख्य दोनच भेद मानणें उचित दिसतें.

कारण स्मार्त स्मृतिप्रोक्त आचार, संस्कार, आश्रमधर्म इत्यादिकांना अधिक मान देतात व तान्त्रिक शैवागम, पांचरात्रागम व वैष्णवी दीक्षा यांना अधिक मान देतात. शंकराचार्यांनीं श्रौत-स्मार्त विधींचें मंडन करून वर्णाश्रमधर्मांची पुनः प्रस्थापना केली. म्हणून त्यांना व त्यांच्या अनुयायी जनांना पाहिजे तर स्मार्त म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. पण त्यांना शैव म्हणणें कितीसें सयुक्तिक आहे, त्याचा विचार विद्वानांनीं अवश्य करावा.

पहिली एकादशी करणें व दुसरी एकादशी करणें, या भेदावरून जरी पाहिलें तरी स्वतः आचार्य व त्यांचे गृहस्थेतर अनुयायी यांना सर्वथा स्मार्तही म्हणतां येत नाहीं. कारण यती, विधवा, विधुर इत्यादि सर्वांना दुसरी एकादशीच विहित आहे; पहिली नाहीं. तस्मात् निर्णय-सिन्धुकारांनीं—' यद्यपि पित्रादेरागमदीक्षायां तन्मात्रस्य वैष्णवत्वं न तु पुत्रादेस्तथापि स्वपारंपर्यप्रसिद्धमेव वैष्णवत्वं स्मार्तत्वं च मन्यन्ते वृद्धाः । ' म्हणजे पिता, पितामह इत्यादिकांतील ज्यानें आगमदीक्षा घेतली असेल त्यालाच तेवढें वैष्णवत्व आहे. दीक्षा न घेतलेल्या त्यांच्याच पुत्राला वैष्णवत्व नाहीं. म्हणजे दीक्षा घेतलेल्या वैष्णव बापाचाही मुलगा दीक्षा घेतल्यावाचून वैष्णव होत नाहीं, हें जरी खरें आहे तरी अलीकडील शिष्ट परंपराप्राप्त वैष्णवत्व व स्मार्तत्वच मानतात—असें जें म्हटलें आहे तेंच योग्य आहे आणि तें पहिली एकादशी करणें व दुसरी एकादशी करणें, यावरच मुख्यतः अवलंबून आहे. आतां अलीकडे स्मार्त व वैष्णव यांचा अज्ञान व आग्रह—प्रत्युक्त द्वेष वाढल्यामुळें भस्म लावणें व तें न लावणें, गंध आडवें लावणें व उभें लावणें इत्यादि बाह्य चिह्नांवरूनच त्यांची ओळख पटूं लागली आहे, हें खरें; परंतु तत्त्वदृष्टि लोक ' न लिङ्गं धर्मकारणं ' याच मनूंच्या वचनाप्रमाणें त्या दोन्ही चिह्नांना महत्त्व देत नाहींत.

असो; येणेंप्रमाणें माहेश्वरदर्शन वेदबाह्य असल्यामुळें वैदिकांनीं आपल्या वैदिक तत्त्वज्ञानाचाच आश्रय करून मनुष्यजन्माचें सार्थक करून घ्यावें, अशी शुभ इच्छा करून आम्ही हें माहेश्वरदर्शनसार ( समतभेद ) समाप्त करतों.

इति श्रीशंकराचार्यभक्त विष्णुशर्मकृत माहेश्वरदर्शनसार समतभेद समाप्त झालें.

श्रीकृष्णार्पणमस्तु.

शके १८३४ माघ शुद्ध पंचमीपासून दर पंचमीस नियमितपणें
प्रसिद्ध होणाऱ्या

# ब्रह्मविद्याग्रन्थरत्नमाला.

## मासिकांत आजवर तयार झालेलीं पुस्तकें.

ऐतरेयोपनिषद्व्याख्यानरूप. किंमत

| | |
|---|---|
| १ अनुभूतिप्रकाश अ. १ पृ. ३४० .... .... .... | १॥ |
| २ आत्मपुराण अ. १ पृ. ४९०.... .... .... .... | २ |
| ३ ऐतरेयोपनिषद्भाष्यार्थ पृ. २४० .... .... .... | १ |

तैत्तिरीयोपनिषद्व्याख्यानरूप.

| | |
|---|---|
| ४ सार्थ तैत्तिरीयोपनिषद् पृ. १२८ .... .... .... | ऽ८ |
| ५ अनुभूतिप्रकाश अ. २ पृ. १२८ .... .... .... | ऽ८ |
| ६ आत्मपुराण अ. १० पृ. २५२ .... .... .... | १ |
| ७ सार्थ नारायणोपनिषद् पृ. १२८ .... .... .... | ऽ८ |
| ८ तैत्तिरीयोपनिषद्भाष्यार्थ पृ. २१० .... .... .... | १ |

## दर्शनमाला.

| | |
|---|---|
| १ चार्वाकदर्शनसार [ सखंडन ].... .... .... .... | ऽ४ |
| २ बौद्धदर्शनसार [ सखंडन ] .... .... .... .... | ऽ६ |
| ३ जैनदर्शनसार [ सखंडन ] .... .... .... .... | ऽ४ |
| ४ श्रीरामानुजदर्शनसार [ समतभेद ] .... .... .... | ऽ७ |
| ५ श्रीपूर्णप्रज्ञदर्शनसार [ समतभेद ] .... .... .... | ऽ४॥ |
| ६ तर्कसंग्रहसार [ मूळासह ] .... .... .... .... | ऽ५ |
| ७ वल्लभदर्शनसार [ समतभेद ].... .... .... .... | ऽ४॥ |

संपादक, ब्रह्मविद्याग्रन्थरत्नमाला.
२४१ सदाशिव पेठ, पुणे सिटी.

## जाहिरात.

" सर्व आस्तिकांस कळावें कीं, पंथ एक्का वेदान्त सर्वेश्वराच्या वार्षिक श्रीविजयादशमी उत्सवाप्रीत्यर्थ आश्वीन शुद्ध १ पासून तों विजयादशमी-दसरापर्यंत रोज सकाळीं सर्वेश्वराची एकादशणीसह पूजा, श्रीदत्तसहस्त्रनामपाठ, श्रीविष्णुसहस्त्रनामपाठ, श्रीलघुगुरुचरित्रवाचन, श्रीगुरुचरित्र अध्याय वाचन, दुपारीं वे. शा. पारखीशास्त्री यांचें पुराण, वेदमंत्रघोष, स्तोत्रपाठ, नित्यपाठ, भजन, वाजंत्रीवादन, प्रसादार्पण वगैरे कामें निरनिराळे वर्षासनवाले करणार आहेत. तरी सर्वांनीं उत्सवास येऊन उत्साह साजरा करावा. जागा—पुणें सदाशिव पेठ २५४.

विष्णू बाळकृष्ण गोखले.

---

ब्रह्मविद्याग्रंथरत्नमाला व आचार्यवर्गणीदार यांस
कार्तिकअखेर सवलत !

# सार्थ लघुवाक्यवृत्ति.

हा ग्रंथ आदि श्रीशंकराचार्यांचा असून त्याच्या अवघ्या १८ श्लोकांतील अर्थगांभीर्य व सिद्धान्तभूत प्रमेयें इतकीं जगन्मान्य आहेत कीं, तीं सर्व धर्मांच्या मुमुक्षूंस अभ्यासविचारजन्य अनुभवानें स्वस्वरूपींच मिळण्याचा अधिकार प्राप्त करून देतात ! त्यावर हंसराज स्वामींनीं मराठी भाषेंत गुरुशिष्यसंवादरूपानें टीका केली आहे. तीही प्रासादिक असून तिचा मराठी भाषेंत सरळ अर्थ केला आहे. सवलतीची किंमत कार्तिकअखेर दीड रुपया. ट. व्ही. पी. चार आणे.

---

# श्रीसंतगाथा.

कबीर, कमाल, सूरदास, मिराबाई, कान्होपात्रा, गोरा कुंभार, सांवता माळी, चोखामेळा, नरहरी सोनार, सेना न्हावी, नरसी मेहेता लतिबशा, दादू पिंजारी, सजन कसाई, जगमित्र नागा, या संतांच्या वचनांची गाथा—सवलतीची किंमत ८ आणे ट. ख. २ आणे.

त्रिंबक हरि आवटे.
मालक ' इंदिरा ' प्रेस पुणें सिटी.